ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी ‘राजहंस’ प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक आठवा
१५ ऑगस्ट २०२५

मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी विशेष
  *निसर्गस्नेही दिलीप कुलकर्णी* / ९
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *समग्र जयंत नारळीकर* - सचिन केळकर / १३
  *सीता* - चन्द्रशेखर टिळक / १६
- वसा अक्षर चळवळीचा
  *बुक ब्रो* - डॉ. आशुतोष जावडेकर / २१
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / २७
- असे जन्मले पुस्तक!
  *युद्धानंतर...* - आदित्य दवणे / ३१
- आठवणींचा पारिजात
  *अवकाशातील अवकाश*
  - डॉ. मानसी मागीकर / ३५
- क... कवितेचा - स्वाती लोंढे / ३९
- उद्गार -
  *लोकशाही आणि हुकुमशाही*
  - मेधा कुळकर्णी / ४१
- राजहंसी पार / ४७
- वाचकांच्या मनातलं... / ५१

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




युद्धाला द्यायला हवा ठाम नकार... या पुस्तकात आहे - युद्धांमागील राजकारण, प्राणघातक शस्त्रास्त्रांच्या शर्यती, अतिरेकी राष्ट्रवादाचे दुष्परिणाम यांसह युद्ध आणि शांतता यांचा सम्यक विचार. त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान आणि इतिहास यांचा युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने घेतलेला परामर्श...

### युद्ध नाकारणारे जग

संदीप वासलेकर

अनुवाद : डॉ. परिमल माया सुधाकर

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)



सरधोपटता वजा केली, की तुम्हाला थोडं अधिक चांगलं लिहिता येऊ शकतं, हे नोरा एफ्रॉन या विदुषीचं तत्त्वज्ञान कविता महाजन यांनी त्यांच्या कथात्म लेखनकाळातच ओळखलं होतं. अकथनात्मक लेखन, अनुवादासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातील लेखक-लेखिकांचं वाचन, संपादन यांमुळे त्यांच्या लेखणीला धार आलेली दिसते. रा. भि. जोशी यांच्या प्रवासपर लेखनकुळाशी जवळचं नातं सांगणाऱ्या या पुस्तकात आहेत प्रवासाच्या गोष्टी आणि गोष्टींचा प्रवास. पृथ्वी, सूर्य, अग्नी, पाऊस आदींच्या उत्पत्तीबद्दलच्या लोककथांचा प्रवास येथे लेखिकेच्या प्रवासाशी एकरूप झालाय. ब्लॉगसाठी लिहिलेल्या या प्रवासनोंदी, पण अत्यंत गंभीर आणि अनेक तपशिलांना कवेत घेणाऱ्या...

### घुमक्कडी

कविता महाजन

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

## विचारी मना तूचि शोधूनि पाहे...

*निसर्गसहवास म्हणजे केवळ पर्यावरण संवर्धन नाही, तर ते आत्मविकसनही आहे. हे एकदा आपल्याला उमजलं, की आपलं स्वतंत्रपणही उमजेल. बालकवींची श्रावणाचं सौंदर्य पाहून 'हर्ष माईना हृदयात' ही जी भावस्थिती झाली, तीच भावस्थिती आपल्यालाही प्राप्त होऊ शकेल.*

वाचकहो नमस्कार.

श्रावण महिना सुरू झालाय. हा केवळ पावसाचा ऋतू नाही, तर तो आहे आपल्या संस्कृतीतील नात्यांचा, श्रद्धेचा आणि सृष्टिसौंदर्याचा उत्सव. त्याबरोबरच आपल्या आत डोकावण्यासाठीचा निसर्गानं बहाल केलेला सुंदर कालावकाश!

*'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे, क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे...'* बालकवींची ही 'श्रावणमास' कविता श्रावणातलं सृष्टीचं रूप रेखता-रेखता मानवी जगतातल्या व प्राणिजगतातल्या प्रसन्नचित्त जगाचंही दर्शन आपल्याला घडवते.

डोंगर-दऱ्यांतून वाहणारे ओहोळ, रानावनांत फुललेली तृणफुलं, नभातील झिम्माड मेघांची चित्रलिपी... हे सारं पाहिलं आणि त्या जोडीला व्रतवैकल्यादी गोष्टींनी सगळीकडील प्रफुल्लित वातावरण अनुभवलं की मन अगदी तरल होतं. नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, स्वातंत्र्यदिन, मंगळागौर, श्रावणी बैलपोळा हे या महिन्यातले सण आपल्या आनंदात भर घालतात. सुखस्वप्नांच्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या नवथर ललनांप्रमाणे भावभावनांच्या हिंदोळ्यावर आपल्यालाही झुलवतात.

या सगळ्याच्या निमित्तानं घडलेलं एक चिंतन तुमच्यासमोर मांडावं असं ठरवलं आहे. हे चिंतन मांडण्याचं आणखी एक विशेष कारण आहे. ते म्हणजे यंदाचा 'राजहंस प्रकाशन' आणि 'डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृति-संशोधन केंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने 'माणूस'कार श्री. ग. माजगावकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कार' ज्येष्ठ पर्यावरणस्नेही दिलीप कुलकर्णी यांना नुकताच प्रदान करण्यात आला. दिलीप कुलकर्णी यांची आजवरची वाटचाल आपल्या विचारांना व जगण्याला दिशादर्शक आहे. या चिंतनातून त्यांच्या जीवनशैलीशी जोडून घेण्याचा एक प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करून आपण पुढची वाटचाल सुरू केली आहे; पण स्वातंत्र्याचा नेमका अर्थ आपल्याला उमगलाय का? स्वतंत्र असणं म्हणजे कशापासून तरी स्वतंत्र असणं आहे का? केवळ राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होणं आहे का? जसा देश स्वतंत्र झालाय तसे आपण स्वतंत्र झालोयत का? मग आपलं स्वतंत्र असणं म्हणजे काय? आपण कशाचे गुलाम होतो, आहोत? प्रश्नांची ही माळ 'जपायला' हवी. भौतिकदृष्ट्या स्वतंत्र असणं ही गोष्ट निश्चितच अर्थपूर्ण आहे. आर्थिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या स्वतंत्र असणं हीदेखील चांगली गोष्ट आहे. मात्र 'स्वतंत्र असणं' या गोष्टीला खूप खोलवर अर्थ आहे. स्वातंत्र्याच्या संकल्पनेत निसर्गासोबतचं नातं समजून घेणं आहे. स्वत:ला समजून घेणं आहे. माणसामाणसातील अवलंबन समजून घेणं आहे. विचारांचं स्वातंत्र्य आपल्याला विवेकाकडे नेतं. आहार-विहारातील स्वातंत्र्य आरोग्याकडे नेतं. आपल्या आध्यात्मिक परंपरेनं 'आत्मस्वातंत्र्य' हेच स्वातंत्र्य आहे असं तर्कशुद्ध पद्धतीनं मांडणी करून सांगितलं आहे. गीतेत नवव्या अध्यायात एक श्लोक आहे -

*'प्रकृतिं स्वाम् अवष्टभ्य विसृजामि पुन: पुन: ।*
*भूतग्रामम् इमं कृत्स्नम् अवशं प्रकृतेर्वशात् ।।८।।'*

प्रकृतीच्या अधीन न होता निर्भर होऊन तिच्यासह जगण्यात मुक्तता आहे हे एक सूत्र आपण जाणून घ्यायला हवं. भौतिक सोयीसुविधांच्या निर्मितीसाठी निसर्गाला अधीन करून घेणं हाच मुळात आपला भ्रम आहे. असं करताना आपण भौतिक गोष्टींच्या कधी अधीन होत जातो आणि त्यालाच आधुनिकता समजतो हे आपल्या लक्षातही येत नाही. निसर्गासोबत राहणं हेच नैसर्गिक जगणं आहे आणि तेच खऱ्या अर्थानं स्वतंत्र असणं आहे. आत्मस्वातंत्र्याइतकं मौलिक काहीच नाही. यालाच जे. कृष्णमूर्ती 'unconditioning of the self' असं म्हणतात.

होतं काय की, 'स्व'तंत्र म्हणजे आपल्याच तंत्राप्रमाणे, आपल्याला हवं तसं वागणं, जगणं असा अगदी वरवरचा अर्थ लावून अनेक लोक जगत आहेत. निसर्गापासून दूर दूर जात आहेत. आपण हे समजून घ्यायला हवं की स्वातंत्र्य ही अनुभवण्याची गोष्ट आहे. ते केवळ बाह्य परिस्थितीत बदल घडवून आणणं नाही; तर स्वत:च्या विचारांमध्ये, भावनांमध्ये बदल घडवून आणणंही आहे. हे अधिकाधिक प्रमाणात निसर्गसहवासातच शक्य नाही का! आपल्या आजच्या जीवनशैलीचा आपण साकल्यानं विचार केला तर आपल्याला काय लक्षात येतं? गतिमानतेची, तंत्रज्ञानावर स्वार झालेल्या तथाकथित जगण्याची कोणती वाट आपण चालतोयत. थोडं थांबून आपल्या मनाला हे शोधायला लावूयात का!

आजच्या धावपळीच्या जीवनात एखाद्या शांत निर्झराच्या काठी बसावं, निसर्गरम्य ठिकाणी जाऊन काही काळ व्यतीत करावा असं आपल्याला वाटतं आणि बरेच जण तसं करतातही. निसर्गसहवास म्हणजे आपल्या आतल्या 'मी'ला भेटणंच आहे. पण

निसर्ग म्हणजे केवळ हिरवी झाडं, निळं आकाश किंवा खळाळणारे झरे नाहीत, तर ती एक समग्र जीवनदृष्टी आहे. जिथे प्रत्येक गोष्टीचा एक अर्थ आहे, एक परिपाठ आहे आणि माणसाचं अस्तित्वही त्या चक्राचाच एक भाग आहे. हेही आपण निसर्गसहवासात जेव्हा जाणून घेऊ, तेव्हा आपल्या जगण्याला एक सुंदर अर्थ प्राप्त होईल.

मग कोणत्याही 'इको-फ्रेंडली' ब्रँडची आपल्याला आवश्यकता भासणार नाही. निसर्गात काही वेळ घालवणं ही 'थेरपी' वाटणार नाही. एखादी टेकडी, एखादी रानवाट चालण्याऐवजी आपली पावलं 'ट्रेडमिल'वर धावणार नाहीत. झाडं पाहण्याऐवजी आपण 'स्क्रीनसेव्हर' लावणार नाही. निसर्गाच्या लयीत आपणही मिसळून जाऊ. नैसर्गिक जीवनशैली म्हणजे फक्त सेंद्रिय खाणं किंवा प्लॅस्टिक टाळणं नाही. आपल्या उपभोगांवरचं नियंत्रण व त्यांचं नियमन. म्हणजेच जिथं आपण 'कमीत कमी' गरजांसह समाधानी असू. आपल्याला हवी असलेली संपूर्ण शांतता ही मोबाईलच्या 'डू नॉट डिस्टर्ब' मोडवर अवलंबून असणार नाही, तर झाडांच्या सावलीखाली बसण्यात सामावलेली असेल. हे अगदीच शक्य झालं नाही तर एका छोट्याशा झाडाला पाणी घालणं, कधी गच्चीवरून आकाशदर्शनाचा आनंद घेणं, ढगांचे बदलणारे रंगाकार निरखणं, उडणाऱ्या पक्ष्याच्या पंखातील डौल पाहणं तर कधी एखादा भातकोंब हातात धरून त्याच्या गंधात हरवून जाणं, हे तर आपण सहज करू शकतो. या छोट्याछोट्या गोष्टी प्रेमातून करण्यानंच आपल्या जीवनाची दिशा बदलत जाते.

निसर्ग आपल्याला त्याच्या प्रत्येक कृतीतून सांगत असतो की, 'सहज जगणं म्हणजेच सुंदर जीवन.' आपण जिथे कमी कृत्रिम असतो, तिथे अधिक खरे असतो. निसर्गसहवास म्हणजे केवळ पर्यावरणसंवर्धन नाही, तर ते आत्मविकसनही आहे. हे एकदा आपल्याला उमजलं की आपलं स्वतंत्रपणही उमजेल. हे घडलं की मग बालकवींची श्रावणाचं सौंदर्य पाहून 'हर्ष माईना हृदयात' ही जी भावस्थिती झाली, तीच भावस्थिती आपल्यालाही प्राप्त होऊ शकेल.

वाचकहो, आपलं हे असं सुंदर जगणं अधिक सुंदर करण्यासाठी पुस्तकांशिवाय दुसरा सांगाती आहे का! उत्तम पुस्तकांतील अक्षरवाटा आपल्याला निसर्गातल्या अक्षय आनंदाकडे घेऊन जात असतात.

म्हणूनच श्रावण महिन्यातील धार्मिक व सृष्टीच्या उत्सवासोबत राजहंस घेऊन आलंय 'राजहंसी पुस्तक योजना'. १ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर २०२५पर्यंत चालणाऱ्या या 'इंद्रधनुषी साहित्य योजने'त आपल्याला २५% सवलतीनं पुस्तकं खरेदी करता येणार आहेत. या योजनेचा आपण वाचकांनी अधिकाधिक लाभ घेतला व आपल्या प्रियजनांना या योजनेविषयी सांगितलं तर तो आमच्यासाठीही आनंदोत्सव होईल.

आपल्या प्रतिसादाची आम्ही वाट पाहू. धन्यवाद.

***डॉ. प्रिया निघोजकर***, कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके



भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना, आजवरचा प्रवास, भूमिका आणि कार्यपद्धती, भारतासारख्या खंडप्राय विशाल देशाच्या वाटचालीत असलेला महत्त्वपूर्ण सहभाग यांचा रोचक इतिहास, तोही अत्यंत रंजक पद्धतीने...

### गोष्ट रिझर्व्ह बँकेची

विद्याधर अनास्कर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

फादर दिब्रिटो - ख्रिश्चन साधना-धर्मनिष्ठेने अनुसरलेले आणि महाराष्ट्रधर्म जिवापाड जपलेले विश्वाचे नागरिक. त्यांनी धर्माची डोळस चिकित्सा केली, भक्तीला सामाजिक कार्याची जोड दिली. गगनाचा रहिवासी असलेल्या या साहित्यिकाच्या प्रथम स्मृतिदिनी सादर होत आहे -

सर्वोत्तम व समकालीन

### फादर दिब्रिटो

संकलन व संपादन : करुणा गोखले

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)






औद्योगिक क्षेत्रातील व्यापक अनुभव व प्रदीर्घ अभ्यास, उद्योजकांसोबतच्या उत्तम स्नेहबंधांतून डॉ. अनंत सरदेशमुख यांनी मांडलेले व्यावसायिक यशाचे मर्म, त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील आठ प्रेरक यशोगाथा म्हणजे उद्योजकतेची आकांक्षा बाळगणाऱ्यांसाठी दीपस्तंभच!

### उद्योग यशोगाथा

डॉ. अनंत सरदेशमुख

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी विशेष

## निसर्गस्नेही दिलीप कुलकर्णी

*निसर्गप्रेमी व पर्यावरणतज्ज्ञ दिलीप कुलकर्णी यांना 'राजहंस प्रकाशन' आणि 'डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृति-संशोधन केंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने व 'माणूस'कार श्री. ग. माजगावकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने त्यांच्यासोबतचा डॉ. प्रिया निघोजकर यांनी साधलेला हा मुक्त संवाद...*

*नमस्कार. सामाजिक व साहित्यिक क्षेत्रांतील अत्यंत सन्मानाचा असा 'श्री. ग. माजगावकर पुरस्कार' आपणास नुकताच प्रदान करण्यात आलाय. प्रथमत: त्याबद्दल आपलं हार्दिक अभिनंदन. काय वाटतंय या क्षणी तुम्हाला?*

माझ्यासाठी अर्थातच हा खूप आनंदाचा आणि समाधानाचा क्षण आहे. गेली ४० वर्षं पर्यावरण व निसर्ग संरक्षणासाठी मी जी वैचारिक मांडणी करतोय, व्यापक, एकात्म विचार मांडतोय त्याची दखल या पुरस्काराच्या रूपानं घेतली गेलीय हे आनंदाचंच आहे. केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर एकूण मानवजातीच्या सम्यक विकासासाठी एक अभ्यासक म्हणून मी जी विचारधारा मांडतो आहे, त्यासाठी प्रबोधनाची धडपड करतो आहे, त्याला बळ देणारीच ही घटना आहे असं मला वाटतं. या पुरस्कारासाठी माझ्या कार्याची दखल घेणाऱ्या या दोन्ही संस्थांबद्दल मला आत्मीयता आहे. त्यांना मी मन:पूर्वक धन्यवाद देतो.

*आपण पूर्णत: पर्यावरणपूरक नैसर्गिक जीवनशैली अंगीकारलीय. आपल्या संवाद-संभाषणातून, लेखनातून आपण लोकांचं या संदर्भात गेली अनेक वर्षं प्रबोधन करताय. यामागची आपली प्रेरणा काय? अशा पद्धतीचं आयुष्य आपण जगावं हे आपल्या मनात केव्हा आलं आणि त्याला सुरुवात कशी झाली?*

माझं शिक्षण पुण्यात झालं. नोकरीची सुरुवातही पुण्यात टेल्कोमध्ये झाली. त्यादरम्यान मी 'श्रीगमां'नी स्थापन केलेल्या 'ग्रामायन' संस्थेत आणि त्यांचाच सहभाग असलेल्या 'ग्राहक पंचायत'मध्येही कार्यकर्ता म्हणून काम करत होतो. त्या वेळी अनेक सामाजिक समस्यांचा अभ्यास होत गेला. 'ग्रामायन'मधील समृद्ध

ग्रंथालयानं माझी मानसिकता घडत गेली. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून आपण काही करावं असं मनात येत होतं. तेव्हा विचार केल्यावर माझ्या असं लक्षात आलं की, सामाजिक समस्यांचं मूळ हे व्यक्तीचे वाढणारे उपभोग यात आहे. उपभोगांच्या पूर्ततेसाठी अर्थार्जन वाढतं, संग्रह वाढत जातो. हा उपभोग व्यक्तीला आतून संपवतो आणि बाहेरून कुटुंब, समाज, राष्ट्र व या निसर्गाची हानी करतो. हे दुष्टचक्र थांबवायचं असेल तर केवळ विचार देऊन चालणार नाही. त्यासाठी कृतीची गरज आहे. त्याची सुरुवात मी माझ्यापासून केली. अर्थात हे अगदी लगेचच घडलं नाही. टेल्कोतील नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर मी कन्याकुमारीला स्वामी विवेकानंद केंद्रात पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काही वर्षं काम केलं. त्या काळात आणि केंद्राच्या शिबिरादरम्यान मला जे जीवनव्रती कार्यकर्ते भेटले, त्यांच्याकडूनही मी प्रेरित झालो. आपण प्रत्यक्ष संन्यास न घेताही उत्तम सामाजिक कार्य करू शकतो असं मला त्या वेळी वाटलं. पुढे पुण्यात आल्यावर विवेकानंद केंद्राचा मराठी प्रकाशन विभाग मी सुरू केला. लेखन, संपादन, मुद्रण, छपाई, वितरण हा सगळाच अनुभव माझ्या गाठीशी होता. माझी आवड, क्षमता आणि केंद्राची गरज यांतून हे सगळं जुळून आलं. त्याच वेळी पर्यावरणाचा विचारही मनात होताच. 'निसर्गायण' हे माझं पहिलं लेखन त्या वेळी पूर्ण झालं. दिलीपरावांना मी ते दाखवलं, त्यांना आवडलं. 'आपण हे प्रकाशित करू.' असं म्हणाले आणि १९८६मध्ये राजहंसकडून माझं पहिलं पुस्तक प्रकाशित झालं. चाळीस वर्षांपासून मी राजहंसशी जोडला गेलोय. तर त्या वेळी आपल्या दैनंदिन जगण्याशी आपण हे कसं जोडून घेऊ शकतो हा विचार केल्यावर मी खेड्यात कायमस्वरूपी येऊन राहण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे इथे कोकणात 'कुडावळे' गावी सहकुटुंब आलो.





आधुनिक तंत्रांचं विविध निकषांवर कठोर परीक्षण करून
त्यांची घातकता दाखवून देणारं हे पुस्तक :
'समुचित' तंत्रांच्या संयमित वापराकडे जाण्याची
आवश्यकता प्रतिपादित करणारं...

## तंत्र-मुक्ती

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ ४२५/- । (ट.ख. ₹ ५०)

*आपला हा निर्णय अगदीच क्रांतिकारक होता. शहरी जीवनातील संधी, आरामदायी आयुष्याकडे पाठ फिरवून कायमस्वरूपी खेड्यात जाऊन राहण्याचा निर्णय सोपा नाही. यावर कुटुंबीयांची प्रतिक्रिया काय होती? त्यांची साथसंगत कशी लाभली आपल्याला?*

मी खूप भाग्यवान आहे की पौर्णिमासारखी सहधर्मचारिणी मला लाभली. ती व्यवसायानं डॉक्टर आहे. माझ्या प्रत्येक निर्णयात तिचा सहभाग आहे. आमचं लग्न ठरलं तेव्हा मी नोकरी सोडलेली होती. त्याही परिस्थितीत माझ्यासारख्या वेड स्वीकारलेल्या व्यक्तीसोबतच्या सहजीवनाचा तिचा निर्णय कायम होता. तेव्हा संपादन, लेखन ही माझी आवडीची कामं सुरू होती. वर्तमानपत्रातील लेखन सुरू होतं. वैदिक गणितावरची माझी पुस्तकं प्रकाशित झाली होती. १९९३ सालापासून आम्ही इथे खेड्यात मर्यादित तंत्रज्ञानाचा आधार घेऊन नैसर्गिक, पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारून आनंदानं राहतोय. यातून आमच्या कामाला प्रचंड ऊर्जा मिळते आहे. कसं आहे की, लोकांचं प्रबोधन करणं हा आमच्या कामाचा अर्धा भाग आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली वाढवत नेणं, हा आमच्या जगण्याचा गाभा आहे.

*'आधी केले मग सांगितले' असंच आपलं हे कार्य आहे. आपण केवळ पर्यावरण संरक्षणाचे, संवर्धनाचे विचार मांडत नाही आहात तर प्रत्यक्ष तसंच जीवन जगता आहात. आपल्या या कार्याला लाभत असलेल्या प्रतिसादाबद्दल काय सांगाल?*

खरंय तुमचं. लोक विचार ऐकून, वाचून प्रभावित होतात. महत्त्वाचा आहे तो प्रत्यक्ष जगण्यात झालेला बदल. राजहंस प्रकाशनाकडूनच माझं 'हरित साधक' हे पुस्तक प्रकाशित झालंय. त्यात मी याविषयीचे अनुभव लिहिलेत. भौतिक सुखसोयींनी युक्त, जगण्याचा मुख्य प्रवाह हिमतीनं नाकारून, त्यातून बाहेर पडून वेगळ्या वाटा चोखाळणारे जे लोक मला भेटले; ज्यांनी पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारली, त्यांचा परिचय मी त्या पुस्तकात करून दिलाय.

*पण प्रत्येकच व्यक्तीला असं खेड्यात जाऊन राहणं शक्य नाही. मग आपल्याच ठिकाणी राहून, आपलं कार्यक्षेत्र सांभाळून असं जीवन आपण कसं जगू शकतो?*

आपण ठरवलं तर खूप गोष्टी शक्य आहेत. 'दैनंदिन पर्यावरण' या माझ्या पुस्तकात दैनंदिन जीवनात करता येण्यासारख्या, टाळता येण्यासारख्या १०१ गोष्टी मी सांगितल्या आहेत. त्याला एक पर्यावरणीय दृष्टी आहे. प्रत्येकाला सहज जमू शकणाऱ्या गोष्टी आहेत त्या. अनेकांनी त्यापासून प्रेरणा घेऊन सुरुवातही केलीय त्याप्रमाणे जगायला.

*आपण करत असलेल्या प्रबोधनाची, चळवळीची ही पोचपावतीच आहे!*

*तुम्ही तंत्रमुक्तीविषयी बोलता आणि जग तर नव्या तंत्रज्ञानाच्या अभ्यासात गुंतलंय. भौतिक प्रगतीनं निसर्गावर किती आघात केलाय, हे आपण पाहतोय. निसर्गाची व्यवस्था समजून न घेणाऱ्या माणसाकडून तंत्रज्ञान वेगानं विकसित होतंय. या तथाकथित प्रगतीकडे आपण कसं पाहता?*

मुळात प्रगती आणि विकास या संकल्पना समजून घ्यायला पाहिजेत. भौतिक प्रगतीनं आपल्यापुढे अनेक अनुत्तरित समस्या निर्माण करून ठेवल्यात. त्यातून मानवजातीचा सर्वनाशच घडतो आहे. २१व्या शतकात विकासाच्या वेगळ्या वाटा चालण्याची गरज आहे. याविषयीही पुष्कळ लेखन मी केलंय. अर्थार्जन, उपभोग आणि संग्रह या मूलभूत बाबी व त्या संदर्भानं संसाधनांचा, ऊर्जेचा संयमित वापर याविषयी जेव्हा जेव्हा बोलण्याची संधी मिळते, तेव्हा तेव्हा मी ते लोकांसमोर मांडतो. हळूहळू लोकांना ते पटतं आहे. शाश्वत विकासाकडे तो जायचा प्रयत्न करतोय. तरीही आर्थिक वाढ म्हणजे सम्यक विकास नाही हे मात्र माणसांना कळायला हवं. गतिमान जगण्यानं काहीही साध्य होणार नाहीय. शांत आणि संयमित जगणंच महत्त्वाचं आहे.

*तुकोबा म्हणतात तसं 'येणे सुखे रुचे एकान्ताचा वास' या अर्थी आपण एकांतवासी आहात. मनाशी ठरवलेल्या तत्त्वांसह आपण उभयता जीवन व्यतीत करत आहात. आपला जो काही मर्यादित जनसंपर्क आहे तोही समाजहितासाठीच आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून आपण आजही पर्यावरण प्रबोधनाची चळवळ पुढे नेत आहात. आपणास हा जो पुरस्कार प्राप्त झालाय, तो अगदीच यथार्थ आहे.*

*आपलं पुन्हा एकदा अभिनंदन. आपल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा आणि या मौलिक संवादाबद्दल धन्यवाद.*

❖

अभिनंदन!

'डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृति-संशोधन केंद्र'
आणि 'राजहंस प्रकाशन'



'माणूस'कार
श्री. ग. माजगावकर पुरस्कार

◆

दिलीप कुलकर्णी

## **राजहंसी ग्रंथसृष्टी**

ऐवज विचारांचा

*साहित्य, चित्रपट, संगीत या विषयांवर विविध लेख, चर्चा, समीक्षणं बघायला आणि वाचायला आपण सरावलेले असतो. पण विज्ञानकथा या प्रकाराबाबत मात्र आजही एक दुर्लक्षित कोपरा कायम राहिलेला आहे. मराठीत फारच थोडे लेखक या प्रकाराकडे गांभीर्याने वळले. यामध्ये डॉ. जयंत नारळीकर हे नाव विशेष लक्षवेधी ठरते. 'राजहंस प्रकाशन'ने काही महिन्यांपूर्वी प्रकाशित केलेले 'समग्र जयंत नारळीकर' हे पुस्तक म्हणजे त्यांच्या पाच विज्ञानकथांचा संग्रहित खजिनाच.*

### 'समग्र जयंत नारळीकर' - विज्ञानकथेच्या विश्वातली एक तेजस्वी झेप

*कुतूहल, कल्पकता आणि खगोलशास्त्राचा थरार*

या संग्रहात 'प्रेषित', 'वामन परत न आला', 'अंतराळातील स्फोट', 'व्हायरस' आणि 'अभयारण्य' अशा पाच विज्ञानकथा आहेत. या कथा म्हणजे केवळ विज्ञानाच्या माहितीचा कोश नाहीत, तर त्या मानवी मनाच्या कुतुहलाला, कल्पनाशक्तीला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला भिडवणाऱ्या उत्कंठावर्धक गोष्टी आहेत.

*प्रेषित : विज्ञानात लपलेली भविष्यसूचकता*

या कथेमध्ये अंतराळ, रेडिओ-ॲस्ट्रोनॉमी आणि परग्रहवासीय यांचं अत्यंत गुंतागुंतीचं पण वाचकाला खेचून नेणारं कथानक आहे. १९८६ मध्ये लिहिलेली ही कादंबरी वाचताना 'नेटफ्लिक्स'वरील 'Three Body Problem' ही सिरीज आठवते. ही दोन्ही कथानकं एका कल्पनेवर आधारले आहेत - पृथ्वीवर परग्रहवासीयांचा संपर्क!

'प्रेषित' ही कथा एकाच वेळी अनेक स्तरांवर विचार करायला लावते. पृथ्वीवर आलेल्या एका अनाथ बाळाच्या वाढीतून उलगडणारा बुद्धिमत्तेचा विलक्षण प्रवास, रेडिओ सिग्नल्समधून परग्रहवासीयांनी पाठवलेले संकेत, आणि विज्ञानाच्या पलीकडचं गूढ - हे सर्व गुंफले आहे.

आलोक या पात्राच्या माध्यमातून नारळीकर एका अशा जिवाची ओळख करून देतात, ज्याचं अस्तित्व पृथ्वीपलीकडचं असण्याची शक्यता आहे. त्याचे स्वप्न, त्याचा

असामान्य मेंदू, त्याच्या ओठांवर येणारे अपरिचित शब्द - हे सर्व तांत्रिक रहस्याच्या पायऱ्यांप्रमाणे उलगडत जातं.

*वामन परत न आला : कृत्रिम बुद्धिमत्तेचा आरसा*

आज AI (Artificial Intelligence) बद्दल आपण सगळीकडे बोलतो, चर्चा करतो. पण नारळीकरांनी हे दृश्य ३०-४० वर्षांपूर्वी भेदक दृष्टिकोनातून मांडलं. 'वामन' हा एक यंत्रमानव आहे, जो मानवी वर्तन, ज्ञान आणि संस्कृती आत्मसात करत जातो. पण त्याचं हे अविरत शिक्षण शेवटी काय घडवून आणतं? मानवजातीसाठी तो वरदान ठरेल की संकट?

या कथेत तंत्रज्ञानाच्या पुढील टप्प्यांची झलक आहे - जेव्हा संगणक केवळ आज्ञा पाळत नाही, तर विचारही करतो. ही कथा वाचताना आजच्या AI धोरणांची, ChatGPT आणि मशीन लर्निंगसारख्या गोष्टींची चाहूल लागते.

*अंतराळातील स्फोट : सुपरनोव्हा आणि जीवनाचा संहार*

खगोलशास्त्रातील अत्यंत धक्कादायक घटनेवर आधारित ही कथा आहे - तारकास्फोट, म्हणजे सुपरनोव्हा. सातव्या शतकातील भारताच्या पार्श्वभूमीवर उभी राहणारी ही कथा त्या काळात घडलेल्या एका भयंकर ताऱ्याच्या स्फोटावर आधारित आहे. या स्फोटामुळे पृथ्वीवर आलेले रेडिओऐवजी अणू-कण, त्यांचा मारा आणि त्यामुळे होणाऱ्या परिणामांचं शास्त्रीय विश्लेषण कथेत आहे. एक थरारक गूढ कथा आणि सोबत सखोल वैज्ञानिक माहिती - ही नारळीकरांची खास शैली या कथेत ठळकपणे दिसते.

*व्हायरस : संगणकातून आलेला ग्रहांतर*

आजची पिढी 'संगणक व्हायरस' या संकल्पनेशी परिचित आहे. पण नारळीकर हे विषय त्यांच्या सुरुवातीच्या टप्प्यावर explore करत होते. या कथेत एक व्हायरस रेडिओ दुर्बिणीतून पृथ्वीवर येतो. तो कुठून आला? पृथ्वीवरून की परग्रहावरून? हा प्रश्न कथानकाचं गूढ वाढवतो.

ही कथा एका वेगळ्या प्रकारच्या शत्रूची - डिजिटल आणि अदृश्य - ओळख करून देते. 'परग्रहवासीयांचा संदेश' ही संकल्पना विज्ञानाच्या कल्पनाशक्तीला खाद्य देणारी ठरते.

*अभयारण्य : पृथ्वी म्हणजे एक प्रयोगशाळा*

सर्व कथांमधील सर्वात विचारप्रवर्तक कथा. या कथेत एक भलामोठा प्रश्न उपस्थित होतो - जर आपण पृथ्वीवरील मानवजातीला स्वतंत्र समजत असू, तर कुठे

तरी हे विश्वाच्या कोण्या कोपऱ्यातून कोणीतरी आपल्याला निरीक्षण करत आहे का?

या कथेतील प्रगत जीव पृथ्वीचा उपयोग एका जैविक प्रयोगशाळेसारखा करत आहेत. मानवी जीवन आणि त्याचा उत्क्रांतिशील प्रवास त्यांच्या परीक्षणाचा भाग आहे. आपण जे विचार करतो, जे करतो त्यावर त्यांचं लक्ष आहे - पण ते हस्तक्षेप करत नाहीत. ही कथा एक जबरदस्त धक्का देते आणि खूप काही विचार करायला लावते.

*कथा नाही, विचारांची वाटचाल*

नारळीकर हे प्रखर वैज्ञानिक बुद्धिमत्तेचे, तितकेच साहित्यिक प्रगल्भतेचे द्योतक आहेत. त्यांच्या कथांमध्ये जड विज्ञान, पण सोप्या भाषेतली मांडणी हे वैशिष्ट्य ठळक आहे. 'रेडिओ-ॲस्ट्रोनॉमी', 'सुपरनोव्हा', 'अणु-कण' यांसारखे कठीण विषयही ते कथांमध्ये अशा रितीने विणतात की ते कथानकाचा भाग वाटतात, मुद्दा वाटत नाहीत.

त्यांचे कथानक म्हणजे फक्त विज्ञानाची माहिती नाही, तर भविष्याच्या शक्यतांचं विश्लेषण आहे. १९८०च्या दशकात 'प्रेषित'सारखी कथा लिहून नारळीकरांनी व्हिडिओ कॉल, स्वचालित गाड्या, स्मार्ट संगणकांची कल्पना मांडली. आजचं डिजिटल युग पाहता त्यांची ही दूरदृष्टी वाखाणण्याजोगी ठरते.

हा परिचय प्रथम लिहिला गेला तेव्हा श्री. जयंत नारळीकर हयात होते. पण आता त्यांच्या स्मृतीला अभिवादन करताना या पुस्तक परिचयाचे परत लेखन केले आहे.

*प्रकाशन आणि सौंदर्य*

'समग्र जयंत नारळीकर' हे पुस्तक राजहंस प्रकाशनाने अत्यंत आकर्षक स्वरूपात प्रकाशित केले आहे. मुखपृष्ठ, मांडणी, कागद, आणि प्रिंटिंग यामध्ये सुसंवाद आणि


डॉ. नारळीकरांचे एक रूप आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या खगोलशास्त्रज्ञाचे, तर दुसरे रूप किशोरवयीन मुलामुलींना विज्ञानातील संकल्पना हसतखेळत शिकवणाऱ्या आणि विविध कथांमधून त्यांना रमवत, रिझवत अनोख्या जगाची सफर घडवणाऱ्या विज्ञानलेखकाचे. त्यांच्या प्रतिभाविलासातून उमललेल्या सात बहुरंगी कथांचे इंद्रजाल.



मायाजाल

डॉ. जयंत नारळीकर

किंमत : ₹ ११०/- । (ट.ख. ₹ ५०)

शुद्धता आहे. एक विज्ञानप्रेमी वाचक, शास्त्रज्ञ किंवा विद्यार्थ्याच्या संग्रही या पुस्तकाचा समावेश व्हायलाच हवा.

योगायोगाने, १९ जुलै रोजी डॉ. नारळीकरांचा वाढदिवस आणि तोच राष्ट्रीय विज्ञानकथा दिन म्हणून साजरा होतो. अशा काळात हे पुस्तक प्रकाशित होणं म्हणजे विज्ञानकथेप्रतिचा आदरच.

*शेवटचा सूर : विचार करायला भाग पाडणारी दुनिया*

हे पुस्तक वाचताना केवळ मनोरंजन होत नाही, तर विचारांची नवी दिशा सापडते. विज्ञानाच्या अनिश्चित, अपरिचित जगतात लेखन करणं ही मोठी गोष्ट आहे. पण ते वाचकांपर्यंत पोहोचवणं आणि त्यांना ते समजावणं हे अधिक मोठं आव्हान आहे. जयंत नारळीकर या दोन्ही गोष्टी यशस्वीरित्या करतात.

वाचनानंतर मनात एक गोंधळ निर्माण होतो - आपण खरंच एकटं आहोत का या विश्वात? आणि हे विचार निर्माण करणं म्हणजे विज्ञानकथेचं खरे यश.

***सचिन केळकर***
९८३३५६१४२१

---

## सीता... अभिराम भडकमकरांची

सीता...

अगदी मोकळेपणाने सांगतो हे पुस्तक पहिल्यांदा हातात घेतले तेव्हा माझी मलाच कल्पना नव्हती की हे पुस्तक मला इतके आवडेल. बसल्या बैठकीत हे पुस्तक वाचून पूर्ण केले असे निदान माझ्या बाबतीत तरी झाले नाही. २५८ पानी हे पुस्तक तसे मी बसल्या बैठकीत सहज वाचू शकलो असतो. पण या पुस्तकाने अनेक ठिकाणी मला वेगळा विचार करायला भाग पाडले.

वेगळा विचार.... चांगल्या अर्थाने!

हा लेखक NSDचा विद्यार्थी असल्याने 'भारतीय संस्कृती', त्यातही 'हिंदू संस्कृती'कडे त्या NSD (आणि / किंवा JNU) पद्धतीने बघणार असा माझा पूर्वग्रह होता. पण हे पुस्तक तसे नाही हे पानोपानी पटत जाताना मी विचारात गुंतत गेलो.

त्यातून मी हे पुस्तक बसल्या बैठकीत, एका दमात वाचून पूर्ण करू शकलो नाही.

एकदा वाचले. सलग दुसऱ्यांदा वाचले. त्याच भरात तिसऱ्यांदा वाचले. वाचलेल्या पुस्तकाच्या या वेळी कितीतरी वर्षांनी नोट्स काढल्या.

हे पुस्तक पहिल्यांदा वाचताना मनात भीती ही होती की एक काळ मराठी साहित्यात असा होता की वेगळ्या मार्गाचे वाटसरू ठरलेल्या व्यक्तिरेखांचे (उदाहरणार्थ मंथरा, दुर्योधन) उदात्तीकरण करण्याचे मार्ग प्रशस्त होत होते. तसेच हे पुस्तक असेल का? म्हणजे नाव सीतेचे आणि चरित्र रावणाचे... काही प्रमाणात कैकयीचे या पुस्तकातले चित्रण तिच्या रूढ प्रतिमेबाहेरचे जरूर येते... पण ते मर्यादित आहे... या पुस्तकातलेच तिच्याबद्दलचे वाक्य उपयोगात आणत कैकयीचे वर्णन करायचे झाले तर... 'कैकयीचे रणांगण वेगळेच होते'!

या पुस्तकात सीतेचे वर्णन अनेक ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने, वेगवेगळ्या शब्दांत केले आहे... 'न बोलताही काय आणि कसे सांगायचे हे उमगलेली', 'पृथ्वीचे लघुरूप', 'दाहक पवित्रता', 'निगर्वी विनम्रतेचा पुतळा', 'बुद्धिगर्भ तेज', 'ठाम वैचारिकता', 'बुद्धिवंता', 'आभाळाची स्थितप्रज्ञता', 'कालजया', 'कालातीत' वगैरे वगैरे... पण त्यातील मला सगळ्यात जास्त आवडलेले वर्णन म्हणजे 'सीतेचा डोहच वेगळा होता.'

मला हे वर्णन इतके आवडले की माझी लेखकाशी जरासुद्धा ओळख नसताना त्यांना (आणि प्रकाशकांना) ईमेल पाठवून विनंती केली की 'या पुस्तकाच्या पुढच्या आवृत्त्या काढाल, तेव्हा या पुस्तकाला उपशीर्षक (Sub Title) द्या... 'तिचा डोहच वेगळा' असे!

आनंदाची गोष्ट म्हणजे अभिराम भडकमकराना ही विनंती आवडली असावी. कारण त्यांनी उत्तरात पाठवलेल्या ईमेलमध्ये सांगितले की, त्यांना ही विनंती अतिशय आवडली असून ते पुढील आवृत्तीत नक्की असा बदल करतील आणि ते या बाबतीत प्रकाशकांशी निश्चितच बोलतील.

या पुस्तकाची सुरुवातच होते ती मुळी डॉ. अरुणा ढेरे, डॉ. सुचेता परांजपे, मंगला गोडबोले आणि डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांच्या अभिप्रायांनी...

त्यातही या पुस्तकाचा पहिला छापील शब्द 'सीता शक्ति:'!

या पुस्तकाच्या दुसऱ्या परिच्छेदात डॉ. सुचेता परांजपे यांचा अभिप्राय आहे. त्यातली पाहिलीच ओळ म्हणते... 'सक्षम विचारी सीता'! यानंतरचा या पुस्तकाचा परिच्छेद म्हणजे मंगला गोडबोले यांचा अभिप्राय. त्यात त्या म्हणतात, 'कूटनीती निपुण सीता'! त्यानंतरच्या पानावर डॉ. तांबोळी म्हणतात, 'स्वयंभू, प्रगल्भ, कणखर, राजनीती!' यानंतर मूळ पुस्तक सुरू होत नाही. त्याऐवजी येतात शिरीष सहस्रबुद्धे यांचे 'आस्वादाचे चार शब्द'.

या पाचही गोष्टींतील शब्दन्‌शब्द वारंवार वाचण्याजोगा आहे.

लेखक मनोगतात असे म्हणतात की, ''ते अशा मातीत, अशा संस्कृतीत जन्माला आले की, जिथे आपले देव, आपले धर्मग्रंथ, तत्त्वज्ञान, धारणा या सगळ्यांना प्रश्नांकित करण्याचा एक उपजत अधिकार आहे...''

अगदी पटेल असेच हे वाक्य आहे... (माझे आडनाव टिळक असल्याने उपजत (जन्मसिद्ध) अधिकार हा शब्दच जिव्हाळ्याचा असतो हो!) त्याचा पुरेपूर गैरवापर करत या पुस्तकाविषयी माझ्या मनात आलेले काही प्रश्न या निमित्ताने मांडतो...

सर्वसाधारणपणे सीतेची जी सोशिक प्रतिमा आजपर्यंत अनेकदा रंगवली गेली त्यापेक्षा पूर्ण वेगळी प्रतिमा मांडावी असे अभिराम भडकमकरसरांना का आणि कसे सुचले?

लहानपणापासून आजपर्यंत अनेकदा आपण सगळे असे वाचत वयाने लहानाचे मोठे झालो की ज्या मांडवात राम व लक्ष्मण यांची लग्ने झाली त्याच मांडवात भरत व शत्रुघ्न यांचीही लग्ने झाली. हे पुस्तक या बाबतीत काही वेगळे चित्र सांगते. हे साहित्यिक स्वातंत्र्य की अजून काही?

एक वाचक म्हणून अनेकदा आलेला अनुभव असा की रामायणासंबंधी पुस्तकात शत्रुघ्न आणि महाभारतसंबंधी पुस्तकात नकुल व सहदेव हे बऱ्याच वेळा एकतर अनुल्लेखाने तरी मारले जातात, नाहीतर कमीत कमी शब्दांत त्यांची बोळवण केली जाते. सीतेचा इतका चांगल्या पण वेगळ्या पद्धतीने विचार करणारे हे पुस्तक शत्रुघ्नबाबत मात्र मळलेल्या वाटेनेच का जाते?... अगदी जेमतेम एकदा, तेही एका वाक्यात त्याचा उल्लेख येतो या पुस्तकात...

या ना त्या कारणाने सीता अयोध्येत राहिल्याचा काळ हा सीता अयोध्येबाहेर राहिल्याच्या कालावधीपेक्षा कितीतरी कमी आहे. हे वाटायला लागल्यावर असे लक्षात आले की आजही आपल्या देशाच्या उत्तर भागांत असे म्हटले जाते की 'दिल्ली आणि अयोध्या ही दोन शहरे अशी आहेत की या शहरांवर प्रेम करणाऱ्या, या शहरांसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना या शहरांचा सहवास, निवास लाभत नाही!'

या पुस्तकाचा मजकूर रामायणानंतरचा काळ आठवायला लावतो असे अजून एक उदाहरण म्हणजे या पुस्तकात रावणाचे सल्लागार म्हणून छद्ममूर्ती आणि विकटकीर्ती अशी दोन काल्पनिक पात्रे प्रस्तुत पुस्तकाच्या लेखकाने रंगवली आहेत. ही नावे या पुस्तकात वारंवार येतात. ही नावे या पुस्तकात वाचताना कधी मला जॉर्ज ओरवेलच्या १९८४मधली मित्रांची जोडगोळी आठवत होती तर कधी अलीकडच्या दिल्लीच्या ल्यूटन्समधले सरकारी बुद्धिवंत!

ही दोन नावे वाचताना असेही वाटत होते की कोणते आईवडील आपल्या मुलांची नावे अशी ठेवतील? पण त्याच वेळी लक्षात येत होते की महाभारतात आहेत की अशीच दुर्योधन, दु:शासन अशी नावे!

या पुस्तकात असुर राज्य आणि असुर वर्तनाचेही उल्लेख येतात. ते वाचताना मला सारखे जॉर्ज ओरवेलचेच 'Animal Farm' हे पुस्तक आठवत होते... 'All are equal; but some are more equal'वाले!

या पुस्तकात एके ठिकाणी उल्लेख आहे... 'विद्यावंताच्या भ्रष्टतेची किंमत

समाजाला चुकवावी लागते.' हा संदर्भ वाचताना कोणती सर्वपक्षीय उदाहरणे आठवत असतील याचा वेगळा सविस्तर उल्लेख करण्याची आवश्यकताच नाही.

शत्रूला त्याच्याच भाषेत प्रत्युत्तर देणाऱ्या राजावर प्रजानन जीव ओवाळून टाकतात असे या पुस्तकात वाचताना मनात राजा पौरस, छत्रपती शिवाजी महाराज, शास्त्रीजी, अटलजी आठवायला लागले.

लंकाधिपती रावण आणि त्याचे छद्ममूर्ती व विकटकीर्ती हे सहकारी यांच्यातील या पुस्तकात दिलेल्या घडामोडी वाचताना कुठेतरी आयन रँडच्या 'फाऊंटनहेड' (आणि काही प्रमाणात 'Atlas Shrugged'ही) ही कादंबरी नजरेसमोर तरळत राहिली.

पुस्तकातील एका प्रसंगात राजनीती आणि मानवी कल्याण यांची तुलना करताना आत्मीयता हा पैलू घेऊन थोडी चर्चा आहे. ती चर्चा वाचताना आपल्या महाराष्ट्रात राबवली गेलेली मूळ स्वरूपातील रोजगार हमी योजना आणि त्यामागची बाळासाहेब भारदे आणि वि. स. पागे साहेबांनी त्याची केलेली तत्त्वचिंतनात्मक मांडणी फार फार आठवायला लागली.

पुस्तकात शिवधनुष्याची चर्चा दोनदा येते... सीतेच्या स्वयंवराचा पण हा पहिला प्रसंग आणि नंतर सीता आणि भगवान परशुराम यांच्यात याबाबत झालेली चर्चा असा जो प्रसंग या पुस्तकात चितारला आहे त्यावेळी. या पुस्तकातील हे दोन्ही प्रसंग वाचताना का कोण जाणे मला फार वाटत होते की ही चर्चा आजच्या अणुबाँब आणि अण्वस्त्र यांच्या उपयोगालाही तंतोतंत लागू पडणारी आहे.

पुस्तकात एके ठिकाणी आश्रमात प्रवेश करताना नैसर्गिक स्रोताच्या कुंडात पदप्रक्षालन करून आत गेले असा उल्लेख आहे. सहज मनात आले की आजही गुरुद्वारात जाताना ही पद्धत अवलंबली जातेच की! आपल्या सोलापूरच्या सिद्धेश्वर मंदिरात जातानाही अशी पद्धत आहे की!

एके ठिकाणी 'भ्रमास्त्र' असा शब्द आला आहे. ब्रह्मास्त्र नाही. हे वाचताना सहज मनात आले की सध्याच्या समाजमाध्यमांना हा शब्द किती मस्त लागू


कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

सीता

अभिराम भडकमकर




आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

पडतो ना!

रामसेतूचे वर्णन या पुस्तकात प्रेमाचे अजरामर स्मारक असे जे या पुस्तकात एकापेक्षा जास्त वेळा येते; तसेच या सेतूचे वर्णन या पुस्तकात एके ठिकाणी 'श्रद्धा व श्रम एकत्र आले तर काहीच असंभव नसते' अशा शब्दांतही आले आहे. हे वाचताना माझ्या नकळत माझ्या नजरेसमोर अयोध्येत राम मंदिर निर्मिती, पोखरण अणुचाचणी, कारगिल विजय, उरी सर्जिकल स्ट्राईक असे सगळे तरळत होते.

'केवळ शस्त्रांनी लढाई करण्याचा काळ आता संपला. लोकांच्या मनात काही धारणा निर्माण कराव्या लागतात' असा किंवा या आशयाचा उल्लेख या पुस्तकात काही वेळा आला आहे. सहजच मनात आले की यालाच हल्लीच्या परिभाषेत Narrative Set करणे म्हणतात ना?

या पुस्तकाचे हेच यश आहे की हे विवरण राम, सीता, रामायण याच्या सारखेच त्याच्या त्याच्या काळाच्या पलीकडे जाते. या लेखनाचा समारोप करताना मला या पुस्तकात एके ठिकाणी 'तिचे सामर्थ्य तिच्या विचारात आहे' अशा शब्दांत केले आहे.

माझे या पुस्तकाविषयी अत्यंत प्रांजळ मत हेच आहे की या पुस्तकाचे सामर्थ्य त्याच्या विचारात आहे.

***चन्द्रशेखर टिळक***, डोंबिवली (पश्चिम)
९८२०२९२३७६

अभिनंदन!



नागपूरचे आयकर आयुक्त व 'राजहंसी' लेखक संदीपकुमार साळुंखे यांचा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन व वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या हस्ते 'उत्कृष्ट सेवा पदक' देऊन नवी दिल्लीत नुकताच गौरव करण्यात आला. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी लिहिलेली 'अंतरीचा दिवा', 'उठा, जागे व्हा', 'हम होंगे कामयाब!' 'धडपडणाऱ्या तरुणाईसाठी' ही पुस्तके राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केली आहे.

# वसा अक्षर चळवळीचा

‘वाचाल तर वाचाल’ हा मंत्र समाजाला कृतीतून दर्शविणाऱ्या समाजमाध्यमांवरील प्रेरक समूहांची माहिती

## बुक ब्रो : शब्दगंगेतील दीप

निमित्त तर किती साधं झालं! मी आणि माझी पत्नी मानसी मार्चच्या उबदार हवेत कॉफी पिताना गप्पा मारत होतो. मी म्हणत होतो, ‘वाचकांना विशेषत: तरुण मुलांना पुस्तकांची नुसती तोंडओळख नव्हे, तर खऱ्या अर्थाने जानपहचान करून दिली तर ते पुस्तक वाचतात.’ आणि हे बोलताना माझं मला जाणवत होतं की ‘लोकसत्ता’साठी मी साहित्यसमीक्षेचे ‘वा म्हणताना’ हे सदर लिहिलं तसं आता पुन्हा लिहिण्यात अर्थ नाही. कारण मधल्या काळात इतक्या झपाट्यानं आपण दृक्‌श्राव्य काळात प्रवेश केला आहे! मग पत्नी म्हणाली, ‘‘तू ‘युट्युब’वर तुझ्या शैलीत पुस्तकांविषयी का बोलत नाहीस? एक छान सिरीज करू शकशील.’’ मला एकदम मस्त वाटलं आणि म्हटलं की या उपक्रमाला आता एक चांगलं शीर्षक शोधायला हवं. आणि ते इंग्रजी हवं कारण या सिरीजमध्ये इंग्रजी पुस्तकंही असतील. ‘ब्रो’ हे सध्याचं तरुण पिढीचं लाडकं संबोधन. माझे अनेक तरुण मित्र आणि फॅन्स मला प्रेमानं ‘बिग ब्रो’ असं म्हणायचे. मग वाटलं की आपण मुळात ‘बुक ब्रो’ आहोत, तर तेच नाव या सिरीजला ठेवू या.

समोर महाराष्ट्र टाइम्सची पत्रकार आणि आमची मैत्रीण प्रगती बाणखेले हिनं पाठवलेलं तिचं नवं पुस्तक ‘ऑन द फिल्ड’ पडलं होतं. माझं वाचून झालं होतं आणि ते मला आवडलं होतं. दुसऱ्या दिवशी घरात कोणी नसताना शांतपणे हातातल्या साध्या फोननं त्या पुस्तकावर बोलत गेलो. गायक म्हणून म्युझिक व्हिडिओ केल्यामुळे थोडीशी जी जाण होती ती वापरून, एडिटिंग वगैरे करून मी ‘बुक ब्रो’चा पहिलावहिला एपिसोड प्रसिद्ध केला. पहिल्याच एपिसोडला रसिकांनी उचलून धरलं. आणि तेव्हापासून आता ९५ भाग झाले आहेत आणि अतिशय जाणत्या रसिकांची सोबत असलेला हा उपक्रम ठरला आहे. साडेपाच हजार सबस्क्राइबर मंडळींचं हे छोटं आणि घट्ट वाचक कुटुंबच तयार झालं आहे.

सुरुवातीला आधी मी फक्त पुस्तकांवर बोलत होतो. मग कुठल्यातरी टप्प्यावर लेखकांशी संवाद सुरू झाला. दोन्ही पद्धतींच्या एपिसोडला जोरदार प्रतिसाद मिळत गेला. मला आठवत आहे, केवढी वेगवेगळी लोकेशन ‘बुक ब्रो’साठी वापरली.

उषा तांबे यांचं राजहंस प्रकाशनचं ‘रोमांचकारी रेल्वे’ हे पुस्तक मी अनेकदा वाचलेलं. त्रिवेंद्रमहून कन्याकुमारीला जाताना रेल्वेमध्ये संपूर्ण डबा रिकामा होता. माझ्याकडे ते पुस्तक काही हातात नव्हतं. मी जेवढं मला आठवेल त्याच्यावरून त्या रेल्वेच्या डब्यात त्या पुस्तकावरचा एपिसोड तयार केला. दुबईच्या बुर्ज खलिफा या उत्तुंग इमारतीच्या वरच्या मजल्यावर काचेला टेकून खाली जमिनीवर मांडी घालून बसलो होतो. खाली पसरलेलं ते शहर बघताना अरेबिक भाषेतील कवितांचे अनुवाद शूट केले. लंडनमध्ये सेंट जेम्स पार्कमध्ये फिरताना हातात मीना प्रभू यांचं ‘माझं लंडन’ होतं. त्यामध्ये त्या बागेतले muggers उर्फ चोरटे हे कसे प्रसिद्ध आहेत हा भाग मी वाचत असताना मला लुटायला मागे एक माणूस आला, तो सगळा थरार त्या एपिसोडमध्ये कॅमेराबद्ध झाला! कधी दिल्लीच्या शासकीय मोठ्या बंगल्यांमध्ये विजय नाईक किंवा ज्ञानेश्वर मुळे यांच्यासोबत शूट झालं तर कधी रत्नागिरीच्या भाट्याच्या समुद्रावर पु.ल., बोरकर, सुनीताबाई आठवत सागरी कवितांचं शूटिंग केलं. एकदा तर मृणालिनी चितळे यांच्या ‘ज्याचं त्याचं एव्हरेस्ट’ या पुस्तकाला लोकेशन साजेसं हवं म्हणून मी लेखिकेला घेऊन थेट टेकडीवर गेलो आणि तिथे शूटिंग केलं.

पण या सगळ्यांमध्ये सगळ्यात जास्त मला आणि पाहुण्यांनाही आवडलेलं लोकेशन म्हणजे माझं घर! समोर कॅमेरा, मी आणि लेखक - बस बाकी कोणी नाही. अशा निर्वेध शांततेमध्ये गप्पा रंगल्या नाहीत तर नवल. त्यामुळे त्या त्या लेखकांचे माझ्या घरी झालेले एपिसोड हे अधिक इंटेन्स झाले आहेत असं मला वाटतं. डॉ. शंतनू अभ्यंकर असे माझ्यासमोर खुर्चीत बसले होते. अतिशय चांगलं शूटिंग झालं आणि एपिसोड रिलीज झाल्यावर दहा एक दिवसांत त्यांचं निधन झालं. ती




पॉप, रॉक, जॅझ, कंट्री, डिस्को...
हे संगीतप्रकार म्हणजे पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रवासातील वेगवेगळ्या पाऊलखुणा. या प्रकारांचा अनुभव देणारं, पाश्चात्त्य जीवनशैली आणि संगीताचा अनुबंध उलगडणारं, मायकेल जॅक्सनपासून शकिरापर्यंतच्या कलाकारांच्या रंगीबेरंगी स्वरचित्रांना शब्दांतून रेखाटणारं लयपश्चिमा संग्रही हवंच...

**लयपश्चिमा**

डॉ. आशुतोष जावडेकर

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

मुलाखत त्यांची शेवटची ठरली. पण अगदी ते जाण्याच्या आधी तीन दिवस त्यांना अनेक जणांनी तो एपिसोड खूप आवडल्याचं सांगितलं आणि ते त्यांनी मला पुन्हा कळवलं याचा मला आयुष्यभर उदास आनंद राहणार आहे. गिरीश कुबेरसर घरी आले आणि एक तासभर आम्ही नॉनस्टॉप एकदाही न थांबता एपिसोड शूट केला. सरांच्या अनेक मुलाखती अनेक चॅनेलवर प्रसिद्ध असतात. पण या मुलाखतीमध्ये सर स्वत:विषयी आणि एकंदर जीवनदृष्टीविषयीदेखील जे बोलले ते विलक्षण होतं आणि ते वाचकांना प्रचंड आवडलं. पुढे कितीतरी दिवस मला मोठ्या मोठ्या प्रतिक्रिया येत होत्या. अरुणा ढेरे म्हणजे आमची अरुणामावशी अशी माझ्याशेजारी बसली होती. शूटिंग सुरू झालं आणि तिच्यातील अरण्यवासिनी पंडिता जागृत झाली! त्या एपिसोडमध्ये प्रेमाविषयी ती जे काही मौलिक बोलून गेली आहे त्याला तोड नाही. रामदास भटकळ किंवा प्रतिभा रानडे ही तर इतकी वयानंही बुजुर्ग मंडळी. दोघांचं वय ८५च्या पुढे. पण माझ्या घरी ते दोघंही आनंदानं आले, मस्त एपिसोड शूट केल्यावर त्यांनी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला आणि आशीर्वाद देऊन गेले. काही एपिसोड हे लेखकांच्या घरी शूट केले गेले. श्रीधर लोणीसरांचं राजहंसचं पाकिस्तानवरचं पुस्तक अप्रतिम आहे. इतक्या सकाळी वर्तमानपत्राचं ऑफिस हे सहसा रिकामं असतं. त्यामुळे त्या शूटिंगची साक्ष म्हणजे दोन संपादक पराग करंदीकर, श्रीधर लोणी, मी एक लेखक आणि तेथील साफसफाई करणारा एक मुलगा असे चौघंच आहोत!

किस्से तर कितीतरी सांगता येतील पण त्याहून अधिक महत्त्वाचा असतो तो या उपक्रमाचा गाभा. वसा घेतल्यासारखं हे मी व्रत चालवलं. पहिले २५ एपिसोड करताना तर प्रत्येक आठवड्यात एक एपिसोड आला पाहिजे असा निश्चय करून कितीही व्यग्र असेन तरीही तो एपिसोड करायचा हा पण पार पाडला. एकदा ताप असतानादेखील शूटिंग केलं तेव्हा जाणवलं की 'बुक ब्रो' आपल्या मनात भरला आहे. हे सगळं करताना महत्त्वाची गोष्ट अशी होती आणि आहे की मी फक्त एवढंच करत नाही. माझी स्वतंत्र संगीतनिर्मिती, साहित्यनिर्मिती या मागच्या तीन वर्षांत जोरदार चालू आहे. 'झी म्युझिक'तर्फे आलेली माझी नवी हिंदी गाणी, माझी नवी पुस्तकं, माझे देशभरातील कार्यक्रम आणि माझी दंतवैद्यकीची प्रॅक्टिस या सगळ्यांमधून वेळ काढणं अवघड असलं तरी ते आनंदाचं होतं आणि माझ्या दृष्टीनं ते अशासाठी महत्त्वाचं होतं की तरुण वर्ग माझ्या डोळ्यांसमोर 'बुक ब्रो'मुळे चांगला वाचक घडताना मला तोवर दिसायला लागला होता. तो धागा मला सोडायचा नव्हता आणि नाही. जी संस्कृती वाचत नाही, लेखकांचा सन्मान ठेवत नाही ती रसातळाला जाते. हे एपिसोड आणणं ही एक लेखक आणि वाचक म्हणून आपली जबाबदारी आहे हे मनात स्वच्छ असल्यामुळे धावपळ झाली पण कधी ताण आला नाही! मनात आनंदच साठत गेला. कधी इंग्रजी पुस्तकं तर कधी

मराठी पुस्तकं या दोन्हींचे आनंद मला शेअर करता आले. सगळं निर्वेध झालं असंही नव्हे. मराठीतील साहित्य व्यवहार हा चांगल्या अर्थानं प्रोफेशनल नाही. कटू म्हणावेत असेही काही लेखकांचे अनुभव मला आले. पण ते अंगाला फार लावून न घेता दूर ठेवणं श्रेयस्कर, हे मनात होतं आणि तोवर पुढचा एपिसोड साद घालत असे. ही सिरीज करताना निदान पहिले १०० एपिसोड आपण कुठलाही स्पॉन्सर अथवा कुठला एकच प्रकाशक असं बांधून घ्यायचं नाही, हे मनात पक्कं केलं होतं. अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींमुळे मर्यादित होतं, ही जगरहाटी मला माहीत आहे. पुढे जर हे 'बुक ब्रो'चं जग वाढत गेलं, तर त्या वेळी योग्य ते निर्णय घेऊ शकतो.

गेले काही एपिसोड बुक ब्रो लाईव्ह इव्हेंट करतो आहे. कथक-गुरू माधुरी आपटे यांच्या डान्स स्टुडिओमध्ये झालेला लाईव्ह कार्यक्रम आणि नंतर एडिट करून आणलेला त्याचा एपिसोड हा प्रचंड गाजला. कधीकधी वाचकांच्या घरी जाऊन त्यांची ग्रंथालयं त्यांच्या शब्दांनी 'बुक ब्रो'नं समजावून घेतली. ठाण्याच्या उपेंद्र आणि अदिती जोशी या दांपत्याचं ग्रंथप्रेम लोकांना इतकं आवडलं, की तो एपिसोड अगदी सणसणीत हिट झाला.

या हिट शब्दावरून एक अजून सांगायला हवं. जर फक्त युट्युबवरचे व्ह्यू हा निकष ठेवला तर एकंदर कुठलेही पुस्तकविषयक कार्यक्रम हे मर्यादित व्ह्यू मिळवतात. मला वाटतं अधिक महत्त्वाचा निकष असतो तो म्हणजे रसिकांची एंगेजमेंट. माझ्या गाण्यांना लाखात व्ह्यूज मिळतात, त्यामुळे मला ते गणित फक्त माहीत आहे. पण 'बुक ब्रो'मध्ये केवळ ५००० व्ह्यू असतील तरीदेखील ज्या प्रतिक्रिया येतात त्या विलक्षण असतात. एकेक कॉमेंट म्हणजे अनेकदा दर्शकांनी लिहिलेला लेख असतो! पुन्हा त्यावर युट्युबच्या कॉमेंट सेक्शनमध्ये चर्चा घडतात. अनेकदा कार्यक्रमांचे किंवा पुरस्कारांचे संयोजक 'बुक ब्रो'चे एपिसोड बघून लेखकांना निमंत्रित करतात. कधी कधी हे ते मला आधी सांगतात आणि कधी कधी नंतर!

बुक ब्रोकडे ही सॉफ्ट पॉवर आली याचं सगळ्यात मोठं श्रेय हे प्रेक्षकांचं आहे, माझ्या सबस्क्राईबर वाचक कुटुंबाचं आहे. आमच्या घरी मदतनीस म्हणून कार्यरत असणाऱ्या वनिता कंधारे यांची अनेकदा घरच्या शूटवेळी मदत होते. माझी पत्नी डॉ. मानसी आणि लेक आरोही यांचा केवळ अदृश्य नव्हे तर दृश्य पाठिंबा सगळ्या एपिसोडमध्ये असतो. विशेषत: आगामी एपिसोड कसे असावेत यावर आम्ही तिघं अनेकदा चर्चा करतो आणि त्यातून पुढची दिशा ठरते. माझ्या आई-वडिलांच्या घरीदेखील अनेक छान एपिसोड शूट झाले आहेत. डॉ राधा मंगेशकर किंवा सत्यशील देशपांडे यांचा एपिसोड मला आत्ता आठवतो आहे. अशा प्रसंगी आईची सगळी मदत होत असते.

आता शंभर एपिसोडला पाच एपिसोड कमी आहेत. पुढचे पाच एपिसोड सणसणीत काहीतरी आणण्यासाठी तुम्हीदेखील अवश्य कल्पना सुचवा. राजहंस ग्रंथवेधचा वाचक वर्ग हा उत्तम सूचना आणि कल्पना मला देईल याची खात्री वाटते. अद्याप जर कधी एपिसोड बघितले नसतील तर माझ्या Ashu's Tunes या चॅनलला सबस्क्राईब करून सगळे एपिसोड सवडीनं बघावेत ही विनंती.

एकदा आनंद अवधानी यांच्यासोबत फार खोल संभाषण झालं होतं. 'बुक ब्रो'चे एपिसोड नक्की आपण का करत आहोत आणि नक्की ते कोण बघतं असा संदेह एका टप्प्यावर मला पडलेला तेव्हा आनंद सर म्हणाले की, ''आशुतोष, तू हे महत्त्वाचं आणि दीर्घ पल्ल्याचं काम करता आहेस. त्याच्या तात्कालिक रिचकडे तू बघू नकोस. मग त्या रात्री जाणवलं की आपला एकेक एपिसोड म्हणजे सायंकालीन उदार गंगेत सोडलेला एक एक दिवा! बस, तो सोडून द्यायचा. काळाच्या प्रवाहात तो लुकलुकत किती पुढे जाईल हे काठावरून बघायचं आणि नव्या उमेदीनं नवे दीप अपेक्षारहित पण निश्चयी मनानं शब्दगंगेत सोडत राहायचं!

या अक्षर चळवळीशी जोडून घेण्यासाठी...

https://youtube.com/@ashustunes?si=sVEMaPMxa0qoz3K4

***डॉ. आशुतोष जावडेकर***

९८२२७९२१३६

---

एक जगणं... उत्कट तरीही सजग. विचारभावनांच्या सुमेळातून आत्मीयतेनं स्वीकारलेलं. निसर्गस्नेही जीवनशैलीनं भारलेलं दिलीप आणि पौर्णिमा कुलकर्णी यांचं हे सहजीवन सर्वांनाच आपलंसं करावं असं वाटणारं. जगण्याची दिशा आणि ऊर्जा देणारं हे पुस्तक संग्रही हवंच...



स्वप्नामधील गावां...

निसर्गस्नेही जीवनशैलीकडे

दिलीप कुलकर्णी । पौर्णिमा कुलकर्णी

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा



देशविदेशातील असंख्य कलाकारांनी आपापल्या कलांतून छत्रपती शिवाजी महाराज घडवले. त्या कलाविष्कारांमागील संघर्षकथाही तितक्याच लक्षणीय. अशा असंख्य कथांचे आणि तशाच व्यथांचे हे अनोखे संकलन म्हणजे इतिहास, चित्रकला आणि शिल्पकला या तिन्ही क्षेत्रांतील असंख्य मान्यवरांच्या कार्यकर्तृत्वाला दिलेली मानवंदनाच आहे!

### कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या

सुहास बहुळकर

किंमत : ₹ १०००/- । सवलतीत : ₹७५० । (ट.ख. ₹ ८०)

रा. स्व. संघातून तयार झालेल्या स्वयंसेवकांनी संघाच्या संस्कारबळावर विविध संघटनात्मक कार्ये उभी केली. विविध सेवाकार्यांत त्यांनी कार्य केले. हाच शक्तिसाठा म्हणजे 'संघपरिवार'. 'सामान्यांतल्या असामान्य क्षमता फुलवून मोठी कामे करणारी संघटना म्हणजे रा. स्व. संघ'



### संघातील मानवी व्यवस्थापन

एका स्वयंसेवकाच्या नजरेतून

नितीन गडकरी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)




सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पृथ्वीचे अंतरंग, तिचे आजतागायत सुरू असलेले बदल आणि त्याला कारणीभूत घटक यांची रंजक आणि सुबोध शास्त्रीय मांडणी...!

### शोध बदलत्या पृथ्वीचा

सतत बदलत्या भूगर्भीय घडामोडींचा वेध

सुनीत पोतनीस

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

# अभिजात मराठीची अक्षरप्रभा

*हजारो वर्षांच्या परंपरेचं पाथेय आपल्या अक्षर वाङ्‌मयातून पुढील पिढ्यांना देणारी, संस्कारशील असूनही आपलं स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. मायमराठीच्या समृद्ध ठेव्यातील भाषेची सौंदर्यस्थळं व सामर्थ्यस्थळं अंशरूपानं वाचकांसमोर ठेवणारं हे सदर. अखेर 'पिंडी ते ब्रह्मांडी...'*

*गडकरी यांचे शिष्य आचार्य प्र. के. अत्रे (१३-८-१८९८ ते १३-६-१९६९) यांनी 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकाला दीर्घ, सखोल, सर्वस्पर्शी आणि भक्तिभावपूर्ण प्रस्तावना लिहून एक प्रकारे आपल्या शिष्यत्वाची सार्थकताच वाचकांना पटविली आहे. गडकऱ्यांसारख्या श्रेष्ठ नाटककार कवीचे अप्रकाशित वाङ्‌मयतुषार, त्या तुषारांचा अत्र्यांनी प्रस्तावनेत गुंफिलेला सुंदर गोफ आणि कै. हरिभाऊ मोट्यांसारखा ग्रंथाला लाभलेला जाणकार संपादक असा त्रिवेणी संगम क्वचित येतो. गडकऱ्यांच्या विविध वाङ्‌मयकृतींच्या निर्मितीचा वेध घेण्याच्या दृष्टीने अत्र्यांची 'झपूर्झा' नामक प्रस्तावना दर्पणासारखी उपयोगी पडणारी आहे. ही प्रस्तावना म्हणजे एक प्रकारे गडकऱ्यांच्या वाङ्‌मयीन जीवनावर अत्र्यांनी नव्याने टाकलेला प्रकाशझोतच. त्यातील हा काही अंश...*

गडकऱ्यांचे कर्तृत्व जसे अलौकिक, तसे त्यांचे व्यक्तिमत्त्वही लोकविलक्षण म्हणून अवघ्या चौतीस वर्षांच्या आयुष्यात एवढा दिग्विजय मिळवून ते गेले. त्यांना जाऊन आता बेचाळीस वर्षे झाली. तरीदेखील अजून त्यांची कीर्ती पहिल्याइतकीच प्रफुल्लित आणि टवटवीत आहे. त्यांच्या वाङ्‌मयाबद्दल आणि जीवनाबद्दल विचार करताना डोळे अद्याप दिपतात. किंबहुना, त्यांच्या अवसानानंतर जशी जास्त वर्षे लोटताहेत, तसतसे त्यांच्याबद्दल आकर्षण जास्त जास्त वाढत चालले आहे. महाराष्ट्राने त्यांच्या गुणांचे जेवढे कोडकौतुक केले, तेवढे कोणत्याही मराठी लेखकाचे केलेले नाही. त्यांच्या काव्याने, नाट्याने आणि विनोदाने महाराष्ट्राला अक्षरश: वेड लावले. त्यांच्या देदीप्यमान भाषेने आणि वैशिष्ट्यपूर्ण शैलीने शारदेच्या अंगावर नवे नवे

अलंकार चढवले आणि मराठी साहित्यात नवे युग सुरू केले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी मराठी भाषेला सामर्थ्य दिले, तर गडकऱ्यांनी मराठी भाषेला सौंदर्य दिले.

गेल्या चाळीस वर्षांत गडकऱ्यांच्या वाङ्‌मयावर अनुकूल आणि प्रतिकूल इतके लिहून झाले आहे की, आता त्यांच्या वाङ्‌मयीन गुणदोषांबद्दल फारसे काही लिहिण्यासारखे उरलेले आहे असे वाटत नाही. गडकऱ्यांनी जे जे लिहिले आहे ते जसे प्रसिद्ध झालेले आहे तसे त्यांच्याबद्दल ज्यांना ज्यांना काही लिहिता येण्यासारखे होते, ते त्यांनीही लिहून टाकले आहे. अशा परिस्थितीत 'अप्रकाशित गडकरी' ह्या मथळ्याने प्रसिद्ध होत असलेले हे पुस्तक बघून गडकरीभक्तांना आश्चर्याचा धक्का बसल्यावाचून राहणार नाही. डोळे रुंदावून आणि भुवया उंचावून ते विचारतील की, 'अप्रकाशित गडकरी' ही काय भानगड आहे? आता गडकऱ्यांचे काय प्रकाशात येण्याचे राहिले आहे? तथापि, पुस्तकाचा केवळ मथळा वाचून चकित झालेले वाचक प्रत्यक्ष पुस्तक वाचून तर अक्षरशः थक्क होतील ह्याविषयी आमच्या मनात बिलकूल शंका नाही. कारण, मराठी भाषेतच काय, पण कोणत्याही भाषेत अशा तऱ्हेचे पुस्तक प्रसिद्ध झाले असेल असे आम्हांला वाटत नाही.

'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकात गडकऱ्यांचे वाङ्‌मय असे फार थोडे आहे. पण ते वाङ्‌मय ज्यातून अंकुरले आहे, त्या तेजस्वी बीजांचे काही नमुने ह्यात पाहायला मिळतील. त्यांचे अमर वाङ्‌मय ज्या प्रतिभेच्या खाणीतून जन्माला आले, तिच्या तेजस्वी अंतर्भागाचे ज्वलंत दर्शन या पुस्तकात घडेल. इतकेच नव्हे, तर त्या खाणीतून बाहेर न पडलेली अशी स्फुट विचारांची आणि कल्पनेची नवनवोन्मेषशाली रत्ने या पुस्तकात इतस्ततः विखुरलेली आढळतील. एखादा रत्नकार किंवा सुवर्णकार आपल्या कलागृहात अलंकार घडवीत असताना रत्नाचे वा सुवर्णाचे कण जसे आजूबाजूला उडतात, त्याप्रमाणे गडकऱ्यांच्या अमर वाङ्‌मयाची निर्मिती होत असताना त्यांच्या प्रतिभेतून विचाराचे वा कल्पनेचे जे जे स्फुल्लिंग उडाले, ते ते या ठिकाणी एकत्रित केलेले पाहावयास मिळतील. सारांश, गडकऱ्यांसारख्या एका प्रतिभाशाली लेखकाच्या अंतर्मनाचे प्रथमच दर्शन घडविणारे हे एक अभूतपूर्व पुस्तक आहे.

कोणतीही कलाकृती लेखकाच्या प्रतिभेतून पूर्ण स्वरूपात जन्माला आली म्हणजेच ती जगाला पाहावयास मिळते. पण प्रतिभेच्या गर्भाशयात त्या त्या कलाकृतींचा संभव कसा झाला, तिचा परिपोष आणि विकास प्रतिक्षणी अन् प्रतिदिनी कसा होत गेला, वेळोवेळी तिच्यावर कोणकोणते संस्कार झाले, तिचे संवर्धन करण्यासाठी कलावंताने कोणती साधना केली, या सर्व वैचारिक प्रक्रिया आणि अवस्था काही जगाच्या दृष्टीसमोर येत नाहीत. वस्तुतः, या गोष्टी कवींनी आणि लेखकांनी जगाला समजावून सांगायला हव्यात. पण पुष्कळदा त्यांना स्वतःलाच आपल्याला काय होते आणि कसे होते हे समजत नाही. म्हणून आपले मानसशास्त्रीय अज्ञान झाकण्यासाठी त्यांनी आपल्या लेखनप्रेरणेभोवती दिव्यत्वाचे एक वलय निर्माण करून ठेवले आहे.

*ही नि:श्वसिते, कोण सोडते, विचारुनी भिऊनी त्याला पुढे करा मग कर आपुला!*

आपले काव्य ही परमेश्वरी नि:श्वसिते आहेत हे लक्षात घेऊनच हिंमत असल्यास त्याजवर टीका करा, असे एका कवीने आपल्या टीकाकारांना धमकावले आहे.

प्रतिभाशाली लेखकांच्या आणि कवीच्या जीवनात स्फूर्तीला फार मोठे स्थान आहे यात शंका नाही. पण स्फूर्ती हा परमेश्वरी चमत्कार नसून ती भावनात्मक तल्लीनतेची एक अत्यंत सूक्ष्मतरल अवस्था आहे. विशिष्ट वेळी किंवा विशिष्ट स्थळी कवीला बाह्य जगाचा आणि आपल्या अस्तित्वाचा विसर पडतो आणि त्याच्या अंत:करणात अकस्मात अननुभूत ऊर्मी उचंबळते आणि त्या क्षणी एखाद्या नवीन विचाराचा साक्षात्कार त्याच्या मनात होतो किंवा एखादी नवी कल्पना विद्युल्लतेसारखी त्याच्या अंतश्चक्षूसमोरून चमकून जाते. त्यातूनच महान कलाकृतीचा जन्म होतो.

गडकऱ्यांनी आपल्या नाटकांत किंवा इतर लेखांत न वापरलेल्या कितीतरी तेजस्वी कल्पना, कोट्या आणि सुभाषिते ह्यांची 'स्मरणार्थ टिपण'मध्ये अगदी रेलचेल उडालेली आहे.

नुसत्या कोट्याच बघा. १. तोंडास तोंड दिले तर दामदुपटीने परत मिळते - एका तोंडाची दोन तोंडे होतात. २. लग्नाच्या शृंखला तोडण्याचा प्रयत्न केला तर खडखडाट जास्त होतो. ३. बाळपणात खेळाचे प्रेम असते. तरुणपणात प्रेमाचे खेळ असतात. ४. माझे प्राण घेशील तर मरेपर्यंत तुझे उपकार विसरणार नाही. ५. मारवाडी लोक कनक आणि कांता दोन्हीही झाकून ठेवतात. ६. पुस्तकांची 'पाने' चाळली पण 'फळ' नाही. ७. या मारामारीत त्याचा हात होता. अन् माझंही अंग होतं. ८. विडा खायचा नाही असा विडा उचलला. ९. भुताचे पाय उलटे तर माणसाचे डोके उलटे. १०. पूर्वी आईबाप मुलांची लग्ने करीत. हल्ली मुलांचे आईबापच लग्ने करतात. ११. गाडी चालू होताच आम्ही स्थिर झालो. १२. वरात आल्यापासून सुनेला नावे ठेवू लागतात. १३. मराठीतील बहुतेक पत्रे मुलांकरता आहेत. मोठ्यांसाठी नाहीत. १४. देवाभोवती फेऱ्या घालण्याने दैवाच्या फेऱ्यातून चुकता येत नाही. १५. हृदयात शिरण्यापूर्वी डोळ्यात भरावे लागते.

चमत्कृतिजनक काव्यमय कल्पना किंवा उत्प्रेक्षा निर्माण करून वाचकांना थक्क करून टाकण्याच्या बाबतीत गडकऱ्यांचा हातखंडा होता.

काशीची गंगा आणि रामेश्वराचा सागर एकत्र आणून शिवछत्रपतींनी ज्याप्रमाणे रायगडावर 'गंगासागर' तलाव तयार केला, त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचे पावित्र्य आणि मराठी भाषेचे सौंदर्य एकत्र आणून गडकऱ्यांनी आपला 'साहित्य सागर' महाराष्ट्रात निर्माण केला असे म्हणता येईल.

*(वि. ग. कानिटकर संपादित 'गाजलेल्या प्रस्तावना'मधून साभार)*

❖

## कलावंतांच्या लेखणीतून साकारलेली 'राजहंसी' विविधा



भवतालाचं भान राखत, निरीक्षणं नोंदवत
नाट्यकलेतील सर्जनप्रक्रिया मांडत
एका नाट्यकर्मी-दिग्दर्शकानं लिहिलेलं हे नाट्यचरित्र.
नाट्यकलेविषयी व्यापक दृष्टी देणारं, विविधांगी
अनुभवांचं संचित वाचकांपुढे ठेवणारं हे पुस्तक.

### चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे...

चंद्रकांत कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)

सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली
माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते.
अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला
पाहण्या-ऐकण्याएवढंच 'वाचणं'ही किती लोभस
असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

### सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)






हे एका शहाण्या मुलीचं मर्मस्पर्शी लिखाण आहे.
तिच्याकडे जीवन समजून घेण्याची असोशी, विचारपूर्वक
जगण्याचं भान आहे. तिच्या मनातली विचारवादळं
आणि अनुभव, यांतूनच नव्याने विणलेले...

### एक उलट... एक सुलट : भाग २

अमृता सुभाष

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## युद्धानंतर...

*माझ्यातल्या कवितेचं पहिलं पान!*
*खोल डोहात एका खडकाखाली पाय फसावा आणि गुदमरताना जखमेचा आक्रोश डोहाबाहेर एकाएकी ऐकू जावा तसा 'युद्धानंतर...' हा काव्यसंग्रह माझ्या बाहेर आला. 'युद्ध' हा विषय अर्थातच रंजनाचा नव्हे, पण तो माझ्या चिंतनाचा झाला गेली सात-आठ वर्षं...*

या कविता मी का लिहिल्या, त्यांची प्रोसेस काय होती यावर दीर्घ बोलण्याची संधी 'राजहंसी पॉडकास्ट'नं मला दिली; आता संग्रह प्रकाशित होऊन पाच-एक महिने होत आहेत, तेव्हा या कालावधीत आलेल्या अनुभवांवर मला इथे व्यक्त व्हावंसं वाटतं. 'राजहंस' ही प्रकाशन संस्था जेव्हा एका लेखकाच्या पाठीशी उभी राहते, तेव्हा तो लेखक एका अनामिक सुरक्षिततेच्या भावनेनं सुखावतो याची प्रचिती मला या काळात आली. एका तरुण लेखकाचं पुस्तक खऱ्या अर्थानं पूर्णत्वास येण्यासाठी एखादी सन्माननीय प्रकाशन संस्था प्रसिद्धीनंतरही त्याच्या सोबत असणं हे खरोखरीच थोर आहे! अनेक दृश्य-अदृश्य हात त्यासाठी कार्यरत आहेत.




'युद्ध' या एका विषयावर मानवतेच्या भावनेतून लिहिलेल्या सहासष्ट कविता म्हणजे एकूण गंभीर मामला होता, पण मला आनंद याचा होतो, की त्या केवळ साहित्यिक वर्तुळात न पोचता विद्यार्थी, प्राध्यापक, कलाकार, अभियंते, डॉक्टर्स, सरकारी-कॉर्पोरेट कर्मचारी अशा साऱ्यांनी हाताळल्या आणि नुसत्या हाताळल्या नाहीत, तर त्यावर त्यांनी प्रतिसादही दिला. काहींना स्थानिक वृत्तपत्रात या संग्रहाचं परीक्षण करावंसं वाटलं, तर साक्षात दिनकर गांगल यांनी महत्त्वाच्या वर्तमानपत्रात या संग्रहावर लेख लिहिला.

साहित्य वर्तुळातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना

भेट दिलेल्या कृतज्ञता प्रती सोडल्यास इतरांनी हा संग्रह विकत घेतला, त्याकरिता लागणारी मेहनत राजहंसच्या मार्गदर्शनाखाली मीही एक कवी म्हणून केली, मात्र त्याचा परिणाम सकारात्मक झाला. प्रसिद्ध गायिका वैशाली सामंत यांनी आवर्जून हा संग्रह विकत घेतला, दरम्यान एका कार्यक्रमात त्यांची भेट झाली, त्या वेळी 'मला एक-एक कविता वाचल्यानंतर धाप लागतीये, मी तुला लगेच अभिप्राय देऊ शकत नाही, हा विषय सलग वाचणे, पचवणे अवघड आहे...' अशी त्यांनी दाद दिली, जी मला महत्त्वाची वाटते. असाच सूर अनेकांचा जाणवला. काहींनी काही कवितांत त्यांना जाणवलेलं न्यून योग्य शब्दांत मांडलं, म्हणजे भौतिकशास्त्राच्या प्राध्यापिका मुदिता सोनावणे यांनी 'एकमेव असा म्हटला तरी चालेल असा प्रयोग आहे हा!' असं म्हणताना, काही त्यांना न पटलेल्या कवितांविषयी त्यांचा स्वत:चा वेगळा परस्पेक्टीव्ह मांडला, जो एक कवी म्हणून माझ्याहीकरिता महत्त्वाचा होता. 'परवेदनेचे यशस्वी स्थलांतर- सत्यजित पाटील', 'युद्धानंतरच्या विनाशाची विदारक बखर- अशोक गुप्ते', 'वैश्विक अशांततेचा भयाण चेहरा: 'युद्धानंतर...'- रामदास खरे', 'निष्पाप जीवांचे आक्रंदन : 'युद्धानंतर...' - विकास भावे' या दीर्घलेखांसोबत किरण येले, भारती बिर्जे, प्रशांत असनारे अशा ज्येष्ठ कवींनीही या माझ्या पहिल्या संग्रहाचं कौतुकानं स्वागत केलं.

कुठल्याही लेखकाचं पहिलं पुस्तक हा त्याच्यासाठी हळवा विषय असतो. त्या पहिल्या-पहिल्या जाणवणाऱ्या गोष्टींमध्ये एक आगळा सुगंध असतो, जो मला या प्रक्रियेत जाणवला. मला माझ्या कवितांसाठी संपादन हवं होतं. ज्यासाठी ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांनी मान्यता दिली. ताईंनी संग्रह शार्प केला. या वर्षीच्या ग्रंथालीच्या 'शब्दरुची' दिवाळी अंकात लिहिलेल्या संपादनविषयक लेखात ताईंना 'युद्धानंतर...'


पृथ्वीवरील खनिजसंपत्ती वाहून नेण्याचे व्यापारी मार्ग फक्त युरोप-अमेरिकेच्या ताब्यात हवेत, ही आजची अटीतटी मोठी आहे. त्यासाठी पाश्चात्त्य सांस्कृतिक संस्था, गुप्तचर यंत्रणा आणि शस्त्रलॉबी एकत्र काम करतात. व्यापारी मार्गावरील देशांना मांडलिक बनवण्याच्या नादात युद्धाचे वणवे पेटवून देतात. मध्यपूर्वेतील अशा युद्धकहराची ही गोष्ट!



वावटळ पेराल, तर वादळच उगवेल!

मिशाएल ल्यूडर्स । अनु : वैशाली करमरकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

संग्रहाचं संपादन करताना आलेल्या अनुभवाचा उल्लेख त्यांनी ‘राजहंस प्रकाशनानं काढलेला हा संग्रह आज वाचकांच्या पसंतीला उतरला आहे, ही माझ्यासाठी आणि त्याच्यासाठीही समाधानाची बाब आहे’ असा केला, जो वाचून मला मनापासून आनंद झाला.

संग्रह अजूनही हळूहळू तसा चालायला शिकतोय, तेव्हा आताशा माझ्यातला कवी एकीकडे समाधानी होताना, तो दुसरीकडे अस्वस्थ आणि अधीर होत असतो. ‘पुस्तक अजून वाचकांपर्यंत पोचायला हवं...’ असं वाटताना मन कधीतरी निराश होतं, पण ‘त्यासाठी काय करता येईल?’ या विचारानं त्याला पुन्हा एकदा उभारी येते.

‘युद्ध’ हा आजचा, धुमसता आणि वैश्विक विषय; मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळताना आपलं साहित्य जागतिक बाजारपेठेत कसं नेता येईल या



दृष्टीनं निदान आतातरी आपण गंभीर विचार करायला हवा. तेव्हा हा संग्रह अनुवादित होऊन खऱ्या अर्थानं तो महाराष्ट्राची आणि मग भारताची वेस कशी ओलांडील हा माझ्यापुढील आत्ताचा यक्षप्रश्न आहे, त्याविषयी याच लेखाच्या मार्फत ग्रंथवेध रसिकांना मी आवाहन करताना ते संग्रह विकत घेऊन त्यावर अभिप्राय कळवतील अशी आशा व्यक्त करतो!


***आदित्य दवणे***

८०९७२४४४६५



माणसात लपलेल्या हिंस्रतेचे अनेकविध पदर
उलगडून दाखवणारा, त्याच्यातल्या माणूसपणाचेही
दर्शन घडवणारा कवितासंग्रह

युद्धानंतर...

आदित्य दवणे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



# ‘राजहंसी’ विविधा




भारतीय रंगमंचावरील कर्तबगार रंगकर्मी, दिग्दर्शिका, अभिनेत्री, लेखिका या विविधांगी भूमिकेतील स्त्री-कलावंतांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध... वीस दिशादर्शक प्रश्नांच्या अनुषंगाने सर्जनशील रंगकर्मींचे हे विचार म्हणजे वाचकांसाठीचा समृद्ध ठेवा...

## वीस प्रश्न

संकल्पना आणि संकलन : महेश एलकुंचवार

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ ५०)

स्वप्न पाहायला कोणी शिकवावं लागत नाही. तरुणाई स्वप्नाळू असतेच; पण स्वप्नं सहजी साकार होत नाहीत. ती कठोर परीक्षा घेतात. अनेकांना अपयशाचे रट्टे देतात. पुढची वाट दिसेनाशी होते. अशा संभ्रमावस्थेत स्वप्नं साकारण्यासाठी साधना कशी व केव्हा करायची हे समजावून सांगणाऱ्या तरुणाचं प्रेरक आत्मकथन.

## धडपडणाऱ्या तरुणाईसाठी

संदीपकुमार साळुंखे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)






मराठवाड्यात जन्मलेल्या, लहानाचा मोठा झालेल्या एका संवेदनशील वाङ्मय-अभ्यासकाची कहाणी. त्याची एकट्याची नाही, तर मराठवाड्याची, तिथल्या माणसांची कहाणी. लेखकाच्या निमित्तानं साकारलेली त्याच्या जगाची ही कहाणी.

## लोभस

### एक गाव - काही माणसं

सुधीर रसाळ

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## अवकाशातील अवकाश

मालिकांमध्ये, चित्रपटांमध्ये काम करून प्रसिद्धी मिळते, पैसाही मिळतो; पण कामाचं समाधान क्वचितच मिळतं. विशेषत: माझ्यासारख्या एखाद्या कलाकाराच्या व्यक्तिमत्त्वाला अभिनयाशिवायही आणखी काही पैलू असले तर हे असमाधान आणखी तीव्र होतं. मी गाणं शिकले होते. मराठी साहित्यात पीएच.डी. पदवी मिळवली होती. मग मी दुसऱ्या कुणीतरी संधी दिल्यावरच काम करते ह्याबद्दल मला खंत वाटत होती. पण काय करायचं हे मात्र सुचत नव्हतं.

अशात माझे काका सु. द. तांबे, जे मराठी भाषेचे नामवंत अध्यापक होते, ज्यांनी माझ्यातले गुण ओळखून माझ्यासाठी काही कथा लिहिल्या होत्या. त्याबद्दल मला शालेय जीवनात बक्षिसंही मिळाली होती, ते मला आग्रहानं सांगत होते की, ''तू तुझ्या कलाप्रवासाबद्दल किंवा एखाद्या चांगल्या विषयावर एकपात्री कार्यक्रम कर.'' ते माझे काका विद्यार्थिप्रिय होते. विद्यार्थ्यांवर मुलांसारखं प्रेम करत असत.

मी अकरावीत असताना अनेक हुशार विद्यार्थ्यांना मराठीत कमी मार्क मिळून त्यांची टक्केवारी कमी होऊ नये, म्हणून खास मार्गदर्शन करत असत. मग त्याच विद्यार्थ्यांना घेऊन त्यांनी 'युवास्नेह' नावाची संस्था काढली. अनेक स्तुत्य उपक्रम केले. आधी सांगितल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना मुलंच मानत असल्यामुळे अधिक श्रावणमासाचं जेवण आयोजित करत असत.

अशाच एका जेवणाच्या प्रसंगी मला गाणं म्हणण्याचा आग्रह झाला. त्या दिवशी मी 'ते माझे घर' हे एक जुनं चित्रपटगीत म्हटलं. त्या दिवसापासून 'घर' या विषयावरची अनेक गाणी, कविता माझ्या मनात घोळू लागल्या. माझे गुरुमित्र सुधीर मोघे ह्यांनी मला भेट म्हणून दिलेलं, कविमनाचे वास्तुशास्त्रज्ञ माधव आचवल ह्यांचं 'किमया' हे पुस्तक मला आठवलं. आचवलांनी किमयामध्ये घर ह्या संकल्पनेबद्दल इतके वेगळे, तरल असे विचार मांडले आहेत. मग 'घर' ह्या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम करायचा असं मी ठरवलं. खेड्यामधले घर कौलारू, खोप्यामधे खोपा सुगरणीचा चांगला, हृदयी जागा तू अनुरागा अशी अनेक गाणी आठवली. पण मला नुसता गाण्यांचा कार्यक्रम करायचा नव्हता.

एक दिवस सकाळमध्ये डॉ. आनंद यादवसरांचा 'ते माझे घर' ह्या नावाचा लेख आला होता. यादव सरांना शिक्षणासाठी फार मोठा संघर्ष करावा लागला होता. खेड्यातल्या घरातून पळून जाऊन शहरात येऊन मोठ्या कष्टांनी त्यांनी शिक्षण

घेतलं, प्राध्यापक झाले, मोठे लेखक झाले. पण आयुष्याच्या ह्या टप्प्यावर त्यांना त्यांच्या खेड्यातल्या घरानंच त्यांचं व्यक्तिमत्त्व घडवल्याची अपरिहार्य जाणीव झाली. ती त्यांनी ह्या लेखात व्यक्त केली होती. तो लेख वाचल्यावर माझ्या मनात लखकन विचार आला, की घराकडे बघण्याचे असे वेगवेगळे दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या साहित्यकृती, म्हणजे गाणी, कविता, ललित लेख ह्यांचं संकलन करून त्या निवेदनानं एका सूत्रात गुंफून कार्यक्रम करावा.

माझं सुदैव असं की, मी असा काही कार्यक्रम करतेय हे कळल्यावर माझ्या अनेक मित्र-मैत्रिणींनी, नातेवाइकांनी माझ्यावर 'घर' ह्या विषयावरच्या कविता, लेख ह्यांचा वर्षाव केला.

माझे पीएच.डी.चे मार्गदर्शक डॉ. सु. रा. चुनेकर सरांनी माधव जूलियनांची *'आमुचे घर छान'* ही कविता तिच्या चालीसकट म्हणून दाखवली. डॉ. विठ्ठल वाघांनी त्यांची अतिशय सुंदर, रूपकात्मक अशी *'छपरावरचे लाल कवेलू, अंबरातले झुंबर झाले, दारापुढल्या अंगणातले शेणसडेही चांदणओले'* ही कविता मोठ्या प्रेमाने दिली. अशीच बा. भ. बोरकरांची, गोव्यातल्या घराचं वर्णन करणारी, शेवटी

*असे माझे गोड घर, केव्हातरी केव्हातरी*
*अक्षरांच्या वाटेनेच उतरेल भुईवरी*

अशी स्वप्न आणि वास्तवाच्या सीमेवरची कविता मिळाली. शान्ताबाई शेळक्यांची *'घरपरतीच्या वाटेवरती धूसर धूसर धूळ उडे'* ही हळवी कविता मिळाली. पुण्यातले प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक बेलवलकर एक साहित्यावर आधारित वार्षिक अंक काढतात. त्यांनी काढलेल्या 'घर' या विषयावरील अंकात ग. वा. बेहेरे ह्यांच्या 'चिमणीचं घर होतं मेणाचं' हा हळवी भावना व्यक्त करणारा लेख मिळाला. 'नटसम्राट' ह्या नाटकातलं प्रसिद्ध स्वगत - 'कुणी घर देता का, घर?' आठवलं. असं बरंच साहित्य गोळा झालं.

हे सगळं साहित्य एका सूत्रात बांधताना मला हळूहळू संगती लागत गेली. 'किमया'मध्ये माधव आचवलांनी मांडलेली 'वास्तू'ची मूलभूत संकल्पना ते संत ज्ञानेश्वरांची 'हे विश्वचि माझे घर' ही संकल्पना सांगणारी ओवी, असा हा प्रवास असायला हवा असं निश्चित केलं.

संहिता तयार झाली. आता नाव काय द्यायचं? तर घर हा शब्द न येता, काहीतरी सूचक, अर्थपूर्ण असं नाव हवं होतं. मग 'किमया'तल्याच एका लेखातला आशय जो 'वास्तू'ची मूलभूत संकल्पना मांडत होता. त्यावरूनच 'अवकाशातील अवकाश' असं नाव सुचलं. प्रेक्षकांना पटकन ह्या नावाचा अर्थ लागणं अवघड होतं. विश्वाच्या अथांग अवकाशात, त्या अथांगतेला घाबरून माणूस 'घर' नावाचा मर्यादित अवकाश तयार करतो असं आचवलांचं म्हणणं मला प्रभावी वाटलं. त्यामुळे मग मला दुसरं कुठलंच नाव योग्य वाटेना.

पहिला कार्यक्रम २८ नोव्हेंबर २००४ला ‘युवास्नेह’ संस्थेतच झाला. ती एक मजेशीरच गोष्ट आहे. संहिता तशी जरा अवघडच झाली होती, पण कीर्तनासारखं सादरीकरणच करायचं असा हट्ट होता. माझी तयारी झाली नव्हती. मोठ्या बहिणीला संहिता घेऊन समोर बसवलं, पण तरीही मी सारखी अडत होते. समोर फार सुजाण, आदरणीय लोक प्रेक्षक म्हणून बसले होते. कसाबसा कार्यक्रम पार पडला. पण फजितीच झाली होती. भयंकर लाज वाटली. इतकी वर्षं अनुभव घेऊन अशी अवस्था व्हावी ह्याचं प्रचंड वैषम्य वाटलं. माझे गुरुमित्र सुधीर मोघे ह्यांनी माझी कानउघाडणी केली.

पण त्यानंतर मात्र प्रत्येक कार्यक्रम प्रेक्षकांच्या मनात ‘घर’ करणारा झाला. अजिबात जाहिरात न करता ७०-७५ प्रयोग केले. स्त्रिया तर जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे अगदी भारावून जात असत. खूप छान अभिप्राय मिळाले. पण एका अभिप्रायानं मात्र मी थक्क झाले. तोही एका पुरुषानं दिला होता.

‘नवीन घराची पूजा करताना आपण वास्तुपुरुषाची पूजा असं म्हणतो; तर हा कार्यक्रम बघून असं वाटतं की तुम्हाला ‘वास्तुस्त्री’ का म्हणू नये?’

असा तो अभिप्राय जरा जास्तच कौतुक करणारा होता, पण एकूणात ‘अवकाशातील अवकाश’मुळे मला आगळं समाधान मिळालं, आत्मविश्वास उंचावला, आत्मिक आनंद मिळाला.

***डॉ. मानसी मागीकर***
९८८११२२५८८

दळवी खरे कसे होते?
हा आहे त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न. त्यांच्या पूर्वायुष्यातील काही घटनांमधून. साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या त्यांच्या व्यक्तिगत अनुभवांतून. त्यांच्या पत्रव्यवहारांतून. मित्रमंडळी आणि नातेवाइकांशी झालेल्या संभाषणातून. आणि खुद्द दळवींशी झालेल्या गप्पागोष्टींमधून...!




जयवन्त दळवींविषयी...

मंगल आठलेकर

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




मृत्यू समीप असतानाही जगावेगळा विचार करणाऱ्या व्यक्तींच्या या आहेत असामान्य जीवनस्पर्शी आणि वास्तवदर्शी कथा... यांतील प्रसंग, गूढता, ताणतणाव आणि दिलासा देणारा हळुवार स्पर्श वाचकांना मनभावन होईल.

### सोबत सांजवेळची

डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी । अनु. : पद्मजा मेहेंदळे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

आजच्या धकाधकीच्या जीवनात मनाला शांतता आणि समाधान मिळवून देणारं, कृष्णाच्या दैवी रूपापल्याड नेऊन त्याची कालातीत शिकवण देणारं आणि प्राचीन परंपरा-वाङ्मयाबद्दल डोळसपण जागवणारं हे संवादात्मक शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णन.

### नंदीघोष-यात्रा

श्रीकृष्णकथा : वेध नवा

सतीश मुटाटकर, यशवंत मराठे
अनु. डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)







अल्पायुषी ठरूनही रसिकांच्या मनावर आजही गारूड करणाऱ्या गुरुदत्तवरील 'चरित्र-कादंबरी-जीवनप्रवास' अशा संमिश्र घाटाचा, त्याच्या चरित्रातील नव्या पैलूंवर प्रकाश टाकणारा हा ऐवज.

### प्यासा

सुधीर नांदगावकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## जन्मसखा

मी जन्मले तेव्हा म्हणे चालू होतं तुझं धुव्वाधार बरसणं ।
म्हणून अगदी तेव्हापासून मनोमन रुजलंय तुझं असणं ।।

दुडूदुडू चालायला लागल्यावर तू आलास की मी नाचायची ।
तुझ्या संथ लयीत टाळ्या पिटत आनंदाने सामील व्हायची ।।

मग वय आलं हळुवारपणे कागदी बोटी पाण्यात सोडायचं ।
जर तू दडी मारलीस तर मनाला कसंतरी समजवायचं ।।

आता आईची काळजी ‘ए बाई! भिजू नकोस गं पावसात’ ।
मग तुझी नाजूक रिमझिम साठवायची मनाच्या कोपऱ्यात ।।

तारुण्याच्या कोवळेपणात तू भासल्यास माझ्यासारखा लाजराबुजरा ।
माझ्याकडे ढगाआडून बघत दाखवायचास तुझा तेजस चेहरा हसरा ।।

नंतर हळूहळू मनात भरायला लागलं तुझं गडद कंच हिरवेपण ।
आणि वाटायला लागलं कसं रे टिकवतोस तुझं ताजं पाऊसपण ।।

आताशा मात्र अगदी अंगावर येतं तुझं बेफिकीर झिम्माड कोसळणं ।
जन्मसखा झालास म्हणून रे काय झालं, बरं नाही हं हे बेपर्वा वागणं ।।

***स्वाती लोंढे***
९८६९४४९२०९

## ‘राजहंसी’ विविधा




नोकरी मागणारा नव्हे, तर अनेकांना नोकरी देणारा
तरुण उद्योजक. विकासाचा वसा घेतलेल्या
हणमंतराव गायकवाडांची अन्
‘भारत विकास ग्रुप’ची कहाणी!

### असाही एक किमयागार

अंजली ठाकूर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

सचोटीच्या, विश्वासाच्या भक्कम पायावर उभी राहिलेली,
सव्वाशे वर्षांची मूल्याधिष्ठित परंपरा लाभलेली,
पाच पिढ्यांनी परिश्रमपूर्वक जोपासलेली भारताची निरलस
उद्यमशीलता म्हणजे टाटासंस्कृती.
जमशेटजी-दोराबजींपासून जेआरडी-रतन टाटांपर्यंत
साऱ्यांच्या कर्तबगारीनं सतत चढतं राहिलेलं
उद्योगतोरण म्हणजेच टाटायन!’



### टाटायन : एक पोलादी उद्यमगाथा

गिरीश कुबेर

आवृत्ती अठरावी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)



हे लेखन म्हणजे, मध्यलयीत चाललेला नर्म विनोदाचा ताल!
किस्से, प्रसंग, घटना वाचत असताना
केवढा मोठा काळ, किती लहानमोठ्या व्यक्ती
वाचकांच्या डोळ्यांपुढून सरकून जातात!

### गेले लिहायचे राहून

विनायक पाटील

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

# उद्गार

नियतकालिकांचे / समाजमाध्यमांचे अभिप्राय

## लोकशाहीबद्दल विचारमंथन

*चपळगावकर यांची ओळख न्यायमूर्ती, कायद्याचे जाणकार इतकीच नाही. कित्येक वर्षं ते सामाजिक-राजकीय चळवळींत सक्रिय होते. कायद्याचं राज्य ज्या तळागाळातल्या माणसांसाठी असायला हवं, त्या माणसांच्या समस्यांशी जोडले गेले होते. त्यामुळे या पुस्तकातलं चिंतन, कथन, मंथन यामागे भारतीय सामान्य माणसाच्या जगण्याचा विचार आहे.*

सद्य:स्थितीत, जेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष अन्य देशांची स्वायत्तता झिडकारून असभ्य उक्ती आणि संहारक कृती करतात, तेव्हा सगळ्यात जुना लोकशाही देश, लोकशाहीचं रक्षण करणारा देश अशा अमेरिकेचा मोठेपणा सांगणाऱ्या वर्णनाचं काय करायचं, असा प्रश्न पडतो. आपल्या भारतातदेखील स्वायत्त संस्थांना अंकित करण्याचं, विरोधकांना नेस्तनाबूत करण्यासाठी या संस्थांचा गैरवापर करण्याचं सरकारचं धोरण आणि अन्य बऱ्याच कृती, निर्णय हे देशातल्या लोकशाहीवर प्रश्नचिन्ह उमटवतात. भारतात आणि जगभरच लोकशाहीबद्दल चिंता वाटावी, असं घडतंय.

सध्याच्या या अवघड काळात वाचायलाच हवं असं एक पुस्तक 'लोकशाही आणि हुकुमशाही'. दिवंगत नरेंद्र चपळगावकर यांनी लिहिलेलं आणि राजहंस प्रकाशनानं प्रसिद्ध केलेलं हे पुस्तक. चपळगावकर यांची ओळख न्यायमूर्ती, कायद्याचे जाणकार इतकीच नाही. कित्येक वर्षं ते सामाजिक-राजकीय चळवळींत सक्रिय होते. कायद्याचं राज्य ज्या तळागाळातल्या माणसांसाठी असायला हवं, त्या माणसांच्या समस्यांशी जोडले गेले होते. त्यामुळे या पुस्तकातलं चिंतन, कथन, मंथन यामागे भारतीय सामान्य माणसाच्या जगण्याचा विचार आहे. नरेंद्र चपळगावकर लोकशाहीचा पुरस्कार करतात, ते सामान्य लोकांचं भलं करण्याची शक्ती या राज्यपद्धतीत आहे म्हणून.

या पुस्तकात इतिहास आहे, वर्तमान काळाचं विश्लेषण आहे, मागचे आणि आताचे भरपूर संदर्भ आहेत. दोन्हींची सांगड घालणारं विचारमंथन आहे. पुस्तकाच्या पानोपानी त्यांची लोकशाही समाजवादावरची श्रद्धा जाणवते. गांधीजी नेहरू-पटेल-

आंबेडकर यांच्याविषयीचा उमाळा दिसतो. या सगळ्यांचे, खास करून नेहरू आणि आंबेडकर यांचे दाखले चपळगावकरांनी जागोजागी दिले आहेत.

भारत ब्रिटिश राजवटीपासून स्वतंत्र झाला तेव्हा स्वातंत्र्य मिळालं म्हणजे लोकशाही आली असंच समजलं गेलं आणि ते योग्यच होतं. स्वातंत्र्यलढ्यातल्या नेत्यांना 'जिम्मेदाराना हुकुमत' हवी होती. म्हणजे देश आणि देशवासी यांच्या विकासाची जबाबदारी घेत लोकशाही चौकटीत काम करायचं होतं.

भारतानं संसदीय लोकशाहीच का स्वीकारली, लोकशाहीची पाऊणशे वर्षं कशी सरली, कायद्याचं राज्य, टीकेचा, निषेधाचा अधिकार, धर्मनिरपेक्षतेची काटेरी वाट, निवडणुका ही पुस्तकातल्या प्रकरणांची शीर्षकं आहेत. याखेरीज उपोद्घात, उपसंहार लिहिला आहे. ज्यांच्या अनेक निर्णयांमधून संविधानाची बूज राखली गेली असे अलिकडेच निवृत्त झालेले न्यायमूर्ती अभय ओक यांनी पुस्तकासाठी लिहिलेली प्रस्तावना छोटेखानी आणि सारगर्भ आहे. मुखपृष्ठ साधंच पण मार्मिक आहे.

भारतातले बहुतेक नेते ब्रिटिश संसदीय पद्धतीला अनुकूल झाले. का? तर त्यांनी इतर पर्यायांचा विचार करून ते नाकारले होते. अध्यक्षीय पद्धतीला तर कुणीच अनुकूल नव्हतं. कारण त्या पद्धतीत लोकांच्या विविध मतांचं प्रतिबिंब केंद्रीय सत्तेत पडण्याची शक्यताच नव्हती. या पद्धतीमुळे हुकुमशाहीचा उदय होऊ शकतो असं या नेत्यांचं म्हणणं होतं. नेहरूंनी तर फॅसिझमबद्दल सावधानतेचा इशारा आधीच दिलेला होता.

निवडणुकांविषयी चपळगावकर लिहितात की, यापूर्वी निवडणुका हे लोकशिक्षणाचं साधन होतं. असायचं. देशातल्या गंभीर प्रश्नांवर भाषणं, ते सोडवायचे कसे याबाबत मांडणी असायची. या प्रकरणात त्यांनी निवडणूक जिंकण्यासाठी सध्या वापरल्या जाणाऱ्या सध्याच्या सगळ्या गैरमार्गांवर खरमरीत टीका केली आहे आणि निवडणूक सुधारणांची गरज प्रतिपादित केली आहे.



व्यक्तिस्वातंत्र्याच्या कडेलोटावर उभे असणाऱ्या भारतीय समाजाला लोकशाही संस्कृतीची आणि धर्मनिरपेक्षतेची अपरिहार्यता, हुकुमशाहीतील धोके सांगणारे, सशक्त लोकशाहीसाठीचे साक्षेपी चिंतन म्हणजे हे पुस्तक -

## लोकशाही आणि हुकुमशाही

नरेन्द्र चपळगावकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

निवडणूक जिंकून विधीमंडळात गेलेले प्रतिनिधी काय करतात? लोकप्रतिनिधी हा पाच वर्षांसाठी जहागीरदार होऊन बसतो, असं नरेंद्र चपळगावकर म्हणतात. त्यांच्या या म्हणण्याचा प्रत्यय मतदारांना येतोच. विशेष करून महाराष्ट्रात अलीकडे झालेली पक्षांची फोडाफोड आणि घाऊक पक्षांतरं याचे आपण साक्षीदार आहोत.

धर्मनिरपेक्षता या मूल्याला धरून राज्य चालवणं ही काटेरी वाट असल्याची जाणीव नेहरूंना होती. म्हणूनच राजकारण आणि धर्म यांच्यात स्पष्ट फारकत असली पाहिजे, असा नेहरूंचा आग्रह होता. शासनाचा कोणताही धर्म असणार नाही. शासनाकडून धर्माच्या आणि जातीच्याही आधारावर भेदभाव केला जाणार नाही, असं राज्यघटनेत नमूद आहे. चपळगावकर लिहितात की, सामान्य माणसाच्या मनात धर्म आणि इतिहास यांच्या अनेक कडूगोड आठवणी रुतून बसलेल्या असतात. त्यावर मात करून राजकारण आणि राज्यव्यवस्था धर्मनिरपेक्ष ठेवायची ही भलतीच अवघड गोष्ट. उदाहरणार्थ, सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराला नेहरूंचा अजिबात विरोध नव्हता. राष्ट्रपतिपदी असलेल्या डॉ राजेंद्रप्रसाद यांनी तिथे जाऊन प्राणप्रतिष्ठा करणं म्हणजे शासकीय पद आणि धार्मिक काम यांची सांगड घालणं होतं. त्याला नेहरूंचा विरोध होता. आज तर सरकारच देवळं बांधत आहे आणि नेते मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करत आहेत.

'विभूतीपूजा म्हणजे अधोगतीकडे आणि अंतिमत: हुकुमशाहीकडे नेणारा खात्रीचा मार्ग आहे,' २५ नोव्हेंबर, १९४९ या दिवशी घटना समितीसमोरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या शेवटच्या भाषणातल्या या विधानाची आठवण चपळगावकर करून देतात.

हे पुस्तक आपल्याला खूप विचार करायला लावतं, हे या पुस्तकाचं यश आहे, असं अभय ओक यांनी प्रस्तावनेत लिहिलंय. त्यांनी काही मौलिक मुद्दे मांडले आहेत.

सात दशके लोटूनही गांधी अजून संपलेले नाहीत!
त्यांचे विचार 'जिवंत आहेत' असे नाही, तर जगभर प्रसार पावताहेत. गांधी-विचारांकडे पाहण्याचा, त्यांतून 'उद्या'साठी योग्य मार्ग शोधण्याचा हा प्रयत्न...



गांधी उद्यासाठी

संपादक : दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

लोकशाहीसाठी परिपूर्ण अशा न्यायव्यवस्थेची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणूनच न्यायव्यवस्थेवर विधायक टीका करण्याचाही मूलभूत अधिकार नागरिकांना आहे. धर्मनिरपेक्षतेविषयी ते म्हणतात की, सहिष्णुवृत्ती बाळगली नाही आणि सर्व धर्मांमध्ये असलेल्या गुणदोषांची कोणताही पक्षपात व पूर्वग्रह न बाळगता जाणीव ठेवली नाही, तर ही संकल्पना प्रत्यक्षात आणणं शक्य होणार नाही. कायदेपालनाविषयी ओक लिहितात की, कायद्याचं पालन आपल्या आचरणाचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थानं कायद्याचं राज्य कधीच येणार नाही.

भारतात लोकशाही नांदावी म्हणून ज्यांनी आग्रह धरला, त्या पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस हे पुस्तक अर्पण केलं आहे. वाढतं वय आणि बिघडलेली तब्येत या स्थितीत नरेंद्र चपळगावकर यांनी या पुस्तकाचं लेखन केलं आणि त्यांनी या जगाचा निरोप घेण्यापूर्वी पुस्तक प्रकाशित झाल्याचं त्यांना पाहायलादेखील मिळालं. किती कळकळीनं त्यांनी हे लिखाण हातावेगळं केलं असेल! दिवंगत नरेंद्र चपळगावकर यांना अभिवादन.

***मेधा कुळकर्णी***

(*महाराष्ट्र टाइम्स, संवाद पुरवणी*, ६ जुलै २०२५मधून साभार)

। श्रद्धांजली ।

मराठी विज्ञानकथा, कादंबरी, अनुवाद अशा साहित्यप्रकारांसोबतच आरोग्यविषयक विपुल लेखन करणारे साहित्यिक डॉ. अरुण मांडे यांचे



दि. २८ जुलै २०२५ रोजी दु:खद निधन झाले.

राजहंस परिवारातर्फे **डॉ. अरुण मांडे** यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

'झेप घे' (राम बक्षाणी यांच्या आत्मचरित्राचा अनुवाद) हे त्यांचे पुस्तक राजहंस प्रकाशनाकडून प्रकाशित झाले आहे.

## ‘राजहंसी’ विविधा

पाणीप्रश्नावर अनोखे कार्य करणारे डॉ. माधव चितळे यांचे प्रेरक चरित्र. नोबेल पुरस्काराच्या समकक्ष असणारा स्टॉकहोम पुरस्कार मिळवणाऱ्या डॉ. चितळे यांची ही जीवनगाथा नवविचारांना चालना देणारी आहे.




### विज्ञानयात्री डॉ. माधव चितळे

अ. पां. देशपांडे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)



अष्टपैलू अभिनेता, प्रतिभावान साहित्यिक, बहुरंगी कलाकार, मिस्कील विनोदकार अशा विविध पैलूंनी प्रभावळकरांचं व्यक्तित्व साकारलेलं आहे. त्यांच्या या झगमगत्या पैलूंची जडणघडण कशी झाली, याचा त्यांनीच घेतलेला रंगतदार वेध..

### मी (असा) कसा झालो?

दिलीप प्रभावळकर

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)

फाळणीच्या वणव्यात होरपळलेल्या एका निराधार सिंधी कुटुंबातला कोवळ्या वयाचा एक किशोर - समुद्रापार सफरीवर निघाला... दुबई नावाच्या दूरदेशी. त्यानं हाल सोसले, कष्ट उपसले, व्यावसायिक जोखीम पत्करून स्वत:च समृद्ध उद्योगविश्व उभारलं. सिंधी समाजाच्या बहुविध पैलूंचं, व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडवणारी आत्मकथा.




### झेप घे : एका उद्योगकर्मीची यशोगाथा

राम बक्षाणी । अनु. : डॉ. अरुण मांडे

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## ‘राजहंसी’ विविधा




डॉक्टर-पेशंट नात्यात विसंवाद निर्माण होण्यास कारणीभूत ठरते वैद्यकीय व्यवसायातील चुरस! वैद्यकीय प्रवेशांतील गोंधळ, याविरुद्धचा लढा, प्रशासन-विद्यार्थी-पालक आणि माध्यमे यांनी एकमेकांवर व न्याययंत्रणेवर टाकलेले डावपेच या साऱ्यांचा, प्रत्यक्ष सहभागी झालेल्या तज्ज्ञाने घेतलेला वृत्तान्तवेध म्हणजे हे पुस्तक -

### शह आणि काटशह
वैद्यकीय व्यवसायातील चुरस

डॉ. राजीव जोशी

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

बुद्धिबळाच्या विविध वैशिष्ट्यांचा... या खेळाच्या इतिहासातील अज्ञात वळणांचा... खेळाडूंच्या कर्तृत्वाचा... आणि चित्रपटातून दिसलेल्या बुद्धिबळ क्षेत्राचा मागोवा घेत बुद्धिबळ जगताची रोचक सफर घडवणारे पुस्तक.

### ६४ घरांच्या गोष्टी

रघुनंदन गोखले

किंमत : ₹ ४७५/- । (ट.ख. ₹ ५०)






अनेकानेक निसर्गचित्रे रेखाटणारी प्रसन्न शैलीतील ही आस्वादक गद्यकाव्ये! हळव्या कविहृदयाच्या धर्मोपदेशकाने रचलेली भावकविता म्हणजे...

### सृजनाचा मळा

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी पार

## काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?

## गोष्ट रिझर्व्ह बँकेची : प्रकाशन सोहळा



डावीकडून सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लेखक विद्याधर अनास्कर, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे

रिझर्व्ह बँकेच्या इतिहासाचा मागोवा घेणाऱ्या आणि बँकिंग क्षेत्रातील दुर्लक्षित पैलूंना गोष्टरूपात उजाळा देणाऱ्या ‘गोष्ट रिझर्व्ह बँकेची’ पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १४ जुलै रोजी विधानभवनातील सभागृहात करण्यात आले. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त झालेल्या विशेष बैठकीपूर्वी पुस्तकाचे प्रकाशन झाले. राज्य सहकारी बँकेचे प्रशासक आणि ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांनी पुस्तक लिहिले आहे.

रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेपासून ते १९८२पर्यंतच्या घडामोडींवर आधारित पुस्तकात ५१ प्रकरणे आहेत. त्यामध्ये मध्यवर्ती बँकेच्या संकल्पनेचा प्रवास, बोधचिन्ह, सुरुवातीच्या काळातील घडामोडी, सर वॉरेन हेस्टिंग्सपासून सुरू झालेली मध्यवर्ती बँकिंगची प्रक्रिया अशा महत्त्वपूर्ण पैलूंचा समावेश आहे.

प्रकाशन समारंभास सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, गृहनिर्माणमंत्री अतुल सावे,

पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, मत्स्य व बंदरे विकासमंत्री नीतेश राणे, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर आणि मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, ''रिझर्व्ह बँकेसारख्या संस्थेचा व्यापक इतिहास प्रथमच स्थानिक भाषेत गोष्टरूपाने सादर करण्याचा हा अनोखा प्रयत्न आहे. राज्याच्या सहकारी बँकिंग इतिहासाला समर्पित हे पुस्तक सहकार चळवळीतील अभ्यासक, बँकिंग क्षेत्रातील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.''

पुस्तकाला ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची प्रस्तावना लाभली आहे.

❖

---

## फादर दिब्रिटो प्रथम स्मृतिदिन : तीन ग्रंथपुष्पांचा लोकार्पण सोहळा

२५ जुलै, २०२५ रोजी फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना आपल्यातून जाऊन एक वर्ष झाले. त्या निमित्ताने जेम्स लोबो, फादर रुमाव हे त्यांचे भाचे व इतर कुटुंबीय यांनी त्यांच्या वार्षिक श्रद्धांजलीचा कार्यक्रम नंदाखाल चर्च (वसई) येथे आयोजित केला होता. त्याच्या आयोजनाची व संयोजनाची संपूर्ण जबाबदारी 'प्रबोधन' या फादर दिब्रिटो यांच्या आप्त संस्थेने उचलली होती. या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग होता राजहंस प्रकाशन निर्मित व फादर दिब्रिटो लिखित तीन पुस्तकांचे प्रकाशन.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नंदाखाल चर्चमध्ये स्मृतिदिन विशेष मिस्सा पार पडला. त्यातील उल्लेखनीय बाब म्हणजे सर्व प्रार्थना मराठीमध्ये होत्या. या विशेष प्रार्थनेसाठी फादर यांच्याबरोबर प्रदीर्घ स्नेह राहिलेले वसई परिसरातील सहकारी निमंत्रित केलेले होते. त्यामध्ये सुवार्ताचे विद्यमान संपादक फादर ज्योएल डिकुन्हा, सन्माननीय बिशप थॉमस डिसोझा आदींचा समावेश होता. प्रार्थनेनंतर चर्चच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहामध्ये पुस्तक प्रकाशनाचा सोहळा संपन्न झाला. संपूर्ण सभागृह दिब्रिटोप्रेमी ग्रामस्थ, कार्यकर्ते, सुवार्ताचे लेखक आणि वाचक यांनी तुडुंब भरून वाहत होते. सुमारे साडेपाचशेहून अधिक  साहित्यप्रेमींनी या सोहळ्याचा लाभ घेतला.

सर्वप्रथम चर्चशी निगडित गानवृंदाने मराठीमधून एक अत्यंत सुरेल प्रार्थना सादर केली. फादर रुमाव यांनी प्रास्ताविकामधून फादर दिब्रिटो यांच्या काही आठवणी जागवल्या व सोहळ्याचे औचित्य स्पष्ट केले. त्यानंतर 'सर्वोत्तम व समकालीन फादर दिब्रिटो' या फादर दिब्रिटोंच्या लेखनाच्या संकलनाचे प्रकाशन झाले. त्याप्रसंगी संकलनाच्या संपादक करुणा गोखले यांनी दिब्रिटो यांच्या




डावीकडून फादर रॉड्रिग्ज, फादर रुमाव, फादर डिकून्हा, बिशप डिसोझा,
करुणा गोखले, प्रिस्ट डॉमिनिक डिएब्रिओ

लेखनाची शैलीवैशिष्ट्ये आणि समकालीनता विशद केली. तसेच संकलनासाठी साहित्य निवडताना दिब्रिटो यांचा धार्मिक सौहार्दाचा व सामाजिक औदार्याचा विचार, त्यांच्या सामाजिक कार्याची दखल, त्यांच्या भाषालालित्याचा आणि नवशब्दनिर्मितीचा आविष्कार हे निकष का ठरवले हे स्पष्ट केले.

दिब्रिटोंच्या 'नाही मी एकला' या आत्मकथनाच्या कपिल केळकरकृत इंग्लिश अनुवादाचे-'I am not Alone'चे लोकार्पण 'सुवार्ता' मासिकाचे विद्यमान संपादक फादर ज्योएल डिकून्हा यांच्या हस्ते पार पडले. त्यानंतर त्यांनी उत्तम अनुवादाचे निकष सांगून श्री. केळकर यांनी ते कसे काळजीपूर्वक पाळले आहेत हे सोदाहरण स्पष्ट केले. फादरच्या विचारांचे सध्याच्या सामाजिक परिस्थितीमध्ये महत्त्व वे ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवण्यासाठी इतर भाषांत ते अनुवादण्याची गरज बोलून दाखवली.

'सुबोध बायबल'च्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन सन्माननीय बिशप थॉमस डिसोझा यांच्या हस्ते पार पडले. सोहळ्याच्या शेवटी अध्यक्षीय भाषणामधून त्यांनी सर्व वक्त्यांनी मांडलेल्या विचारांचा परामर्श घेतला. फादर दिब्रिटो यांच्या सहवासातील काही आठवणी सांगून ख्रिश्चन धर्मविचारातील काही तत्त्वांचा आजच्या सामाजिक वातावरणात अधिक निष्ठेने अंगीकार करणे कसे गरजेचे आहे, हे विशद केले.

कार्यक्रमाची सांगता पुनश्च फादर दिब्रिटोंच्या एका आवडत्या मराठी प्रार्थनेने झाली.

❖

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके




शिक्षणाचे क्षेत्र अमर्याद झाले आहे. शाखा-उपशाखांचा विस्तार होत होत असंख्य अभ्यासक्रमांचे पर्याय आज उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांचा कल ओळखून त्याला मार्गदर्शन करू इच्छिणाऱ्या पालकांना शिक्षक-प्राध्यापकांना असंख्य पर्यायांचा खजिना खुला करणारे हे पुस्तक संग्रही हवेच...

### स्मार्ट करिअर, उज्ज्वल भविष्य

भाग २

सुरेश वांदिले

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

या आहेत विज्ञान प्रयोगकथा. आजूबाजूला सहज उपलब्ध असणाऱ्या गोष्टींतून केलेले प्रयोग मांडणाऱ्या आणि प्रयोगांमागील विज्ञान सोप्या भाषेत समजावून देणाऱ्या कथा. मुलांच्या सुप्त सर्जनशीलतेला वाट करून देणाऱ्या या कथा वाचायलाच हव्यात...




### गंमत शाळा : भाग १

राजीव तांबे

आवृत्ती आठवी । किंमत : ₹१६०/- । (ट.ख. ₹५०)

◆

### गंमत शाळा : भाग ३

राजीव तांबे

आवृत्ती चौथी । किंमत : ₹१३०/- । (ट.ख. ₹५०)



# वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## त्यानंतर...

तुमची कविता समकालीन वास्तव कवेत घेऊन चिरंतनाकडे वळते! हे तिचं सामर्थ्य आणि वेगळेपण आहे!

तुमच्या लिखाणाचं अगदी समर्पक आणि योग्य विश्लेषण आहे. ही माझ्यासारख्या सामान्य वाचकाची प्रतिक्रिया आहे असे मला वाटते.

तुमची कविता सर्वसामान्यांच्या मनातील लाव्हा ओकते. आतडी पिळवटून वेदनेसह ती प्रकटते. जबरदस्त चिरफाड! अंतर्मुख करणारी, कमी अवकाशात भरपूर अभिव्यक्ती करणारी तुमची शैली आहे. त्यामुळे अन्याय होत नाही. कविता छोटी असते म्हणून खंडकाव्य लिहा, अशा स्वरूपाचा शहाजोग सल्ला आहे हा. तुमची कविता समकालाला नेमकेपणाने भिडते!

***डॉ. विनोद गायकवाड***, बेळगाव

गेल्या अर्धशतकातील वेगाने बदलत्या जीवनाच्या साऱ्याच पातळ्या, आयाम, बाजू, संबंध, गुंतागुंत समग्रपणे कवेत घेणाऱ्या, 'मोठ्या समाजमनाचे प्रतिबिंब' अन् 'मोठ्या कालखंडाचा कॅनव्हास' घेऊन काव्यकृती साकारणाऱ्या एका कवीचा काव्यप्रवास...
वेगळी शैली, वेगळा आशय यांनी नजरेत भरणारा...




**त्यानंतर...**

श्रीपाद भालचंद्र जोशी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# माणिक मोती

माणिक वर्मा महाराष्ट्राचाच नव्हे, तर भारताचा खानदानी, अदबशीर, सुरेल आवाज! अतिशय गोड गळ्याच्या या गुणवंत गायिकेचे चाहते आजही सर्वत्र आहेत. त्यांचं नाव घेताक्षणी, 'सावळाच रंग तुझा', 'जाळीमंदी पिकली करवंदं', 'कबीराचे विणतो शेले', 'अमृताहुनी गोड' ही त्यांची सुमधुर, अविस्मरणीय भावगीतं तरुण पिढीही गुणगुणायला लागते २०२५-२६ हे त्यांचं जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्ताने त्यांच्या शिष्या आणि कन्या विविध पद्धतींनी त्यांच्या स्मृतीला उजाळा देत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राजहंस प्रकाशनातर्फे त्यांचं हे चरित्र, 'माणिक मोती' नुकतंच प्रकाशित झालं आहे.

इतक्या मोठ्या ख्यातकीर्त कलावंताच्या आयुष्याचा पट शब्दांत मांडणं तसं कसरतीचं आणि कौशल्याचं काम असतं, पण शोभा बोंद्रे यांनी हे चरित्र सुरेख शब्दबद्ध केलं आहे. या चरित्रात खुद्द माणिकताई आपल्याशी 'बोलतात', आपल्याला त्यांची गाणी 'ऐकायला' मिळतात! क्यूआर कोडचा वापर आजकाल अनेक पुस्तकांमध्ये केला जातो. तंत्रज्ञानाचा हा वापर इथेही केलेला आहे. तो यासाठी विशेष वाटतो, कारण एकीकडे माणिकताईंचे अनुभव वाचता वाचता, कोड स्कॅन करून आपण त्यांचं गाणं त्याच वेळी ऐकूही शकतो! तंत्रज्ञानाचा असा सुखद, सकारात्मक उपयोग होतो, तेव्हा फार समाधान वाटतं.

पुस्तकाची सुरुवात माणिकताईंच्या कथनातून होते. त्यांचं बालपण, गानसाधना, गुरूंची शिकवणी, बाराव्या वर्षीच सुरू झालेल्या मैफिली, घरातलं वातावरण; इतकं प्रांजळ वर्णन वाचता वाचता आपण रंगून जातो.

या पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, यात माणिकताईंच्या बरोबरीनं




शास्त्रीय संगीतातही आपले वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या, संगीतक्षेत्रात लखलखती कारकीर्द साकारणाऱ्या माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त समग्र वर्मा परिवाराच्या कलाकर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या स्मृतिचित्रांचा वेधक शब्दपट -

**माणिक मोती**

**माणिक वर्मा आणि परिवार**

शोभा बोंद्रे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

त्यांच्या चारही मुली, भाऊ, भावजया, संगीतकार आणि शिष्या यांचीही कथनं आहेत. ती 'लिनियर' पद्धतीनं आलेली आहेत. म्हणजे आपण घरात आठ-दहा लोक बसलो आणि एकामागे एक प्रत्येक जण कथेचा एकेक प्रसंग पुढे नेतो, तसेच आहे हे. हे मला फार इंटरेस्टिंग वाटलं. म्हणजे, मुलींच्या बालपणाबद्दल माणिकताईंनी लिहिण्यापेक्षा त्यांच्या मुलींनीच लिहिलं आहे. पुढेही प्रत्येकीनं तिच्या मोठं होण्याबद्दल, करियरबद्दल स्वत: लिहिलं आहे आणि त्यात अर्थात माणिकताईंचा धागा धरलेला आहेच. त्यामुळे एका अर्थी, माणिकताईंच्या बरोबरीनं हे चरित्र अभिनयक्षेत्र गाजवणाऱ्या भारती आचरेकर आणि वंदना गुप्ते, प्रख्यात फिजिओथेरपिस्ट अरुणा जयप्रकाश आणि गायन आणि ध्वनिमुद्रण क्षेत्रात भरारी मारणाऱ्या राणी वर्मा या माणिकताईंच्या सुविद्य आणि प्रतिभासंपन्न लेकींचंही आहे!

त्यातून उलगडतं माणिकताईंचं शास्त्रीय संगीतावरचं प्रेम, त्यांनी त्याचा गांभीर्यानं केलेला अभ्यास, अनेक गुरूंकडून कष्टानं प्राप्त केलेली विद्या, रियाजाप्रति असलेली त्यांची निष्ठा, प्रत्येक मैफिलीमागचा त्यांचा विचार, कुटुंबावर असलेलं त्यांचं प्रेम, त्यांचा जिद्दी, पण साधा, निगर्वी स्वभाव, अमर वर्मा यांच्यासोबतचं मधुर सहजीवन, श्री. वर्मा यांचा भक्कम पाठिंबा आणि खूप काही.

पुस्तकाची भाषा आणि 'फ्लो' झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यासारखा सहज आणि आनंददायक आहे. मध्ये दिलेले फोटो नॉस्टॅल्जिक करतात. सगळ्यात शेवटी नामवंत कलाकारांनी माणिकताईंबद्दल काढलेले गौरवोद्‌गार आहेत- ते वाचता येतात आणि तेही ऐकता येतात.

माणिकताईंना नैसर्गिक गोड गळा लाभला होता. पण त्यांनी तो कधी गृहीत धरला नाही. त्यांनी तो आधी जोखला आणि सतत त्यावर कष्ट घेत राहिल्या. त्यांना कुटुंबाची भक्कम साथ लाभली, आणि त्यांनीही त्याची जाण ठेवली. कलावंत म्हणून त्या महान होत्या, शिवाय, त्या माणूस म्हणूनही 'हव्याहव्याशा' होत्या. म्हणूनच त्यांचा गानविचार, त्यांची गाणी आजही 'रेलेव्हन्ट' आहेत. पुस्तकातले एकेक प्रसंग वाचताना त्यांचा माणकासारख्या लखलखीत स्वभावाचे एकेक पैलू हळूहळू लक्षात येतात. आजच्या भाषेत सांगायचं, तर हे पुस्तक खूप 'पॉझिटिव्ह व्हाइब्ज' देतं. संग्रही ठेवावं असं हे पुस्तक आहे.

***पूनम छत्रे***, पुणे

**मुखपृष्ठावरील पुस्तकाविषयी**

- मी... अल्लादियाखां — किंमत : ₹ ५००/-
  अश्विनी भिडे देशपांडे

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**‘राजहंस ॲप’**

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com


## राजहंस प्रकाशन


- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.